रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ • अंक ३२४
www.ramprahar.com

बुधवार, ११ जून २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## ‘मुंबई उपनगरीय रेल्वेसाठी मास्टरप्लान तयार’



**मुंबई** : उपनगरीय रेल्वेमार्गावर मोठ्या प्रमाणात एसी ट्रेन द्यायच्या आहेत. या एसी ट्रेन भाडेवाढ न करता कशा देता येतील याचा प्लान रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तयार केलेला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १०) पत्रकारांशी बोलताना दिली. ते पुढे म्हणाले, मुंब्रा येथे घडलेली घटना गंभीर आहे. काही माध्यमे रेल्वेमंत्री असंवेदनशील आहेत, असे सांगत होते. मूळात रेल्वेमंत्री माझ्याशी पाऊण तास चर्चा करत होते. अडचणी काय आहेत, उपाययोजना काय आहेत हेही त्यांनी सांगितले. उपनगरीय रेल्वेवरही सर्वांत जास्त गुंतवणूक मोदी सरकारच्या काळात झालेली आहे. प्रवाशांच्या सोयी-सुविधा, सुरक्षिततेसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली आहे. मुंब्रा येथे घडलेल्या घटनेतून काही गोष्टी शिकाव्या लागतील, त्याप्रमाणे काम करावे लागेल. त्याचे प्लानिंग केंद्र आणि राज्य सरकार मिळून करेल.

अंतरंग

रेवदंडा बाजारपेठेत पार्किंग असुविधेने वाहतूक कोंडी/२

खोपोलीमधील आगीत होरपळलेल्या व्यक्तीचा मृत्यू/५

रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत सुरेश बिस्ट प्रथम/८

# राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांना विद्यावेतन

### मंत्रिमंडळ बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय भौतिकोपचार (फिजीओथेरपी) व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल थेरपी) पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याचा आणि बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन सुरू करण्याचा निर्णय मंगळवारी (दि. १०) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.



शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता प्रशिक्षण काळात दरमहा एक हजार ७५० रुपये विद्यावेतन मिळत होते. यामध्ये सहा हजार २५० रूपयांची वाढ करून त्यांना दरमहा आठ हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे, तर याच अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना महागाई भत्त्यासह १० हजार रुपये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वाढीनंतर पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ३३ हजार ७३० रुपये इतके विद्यावेतन मिळणार असून ही वाढ १ जून २०२५पासून लागू होणार आहे.

मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड या पाच ठिकाणी शासकीय परिचर्या महाविद्यालयात बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरू आहे. या प्रत्येकी ठिकाणी ५० विद्यार्थी शिकतात. या विद्यार्थ्यांचा आंतरवासिता कालावधी सहा महिन्यांचा असतो. या विद्यार्थ्यांना दरमहा आठ हजार रुपये विद्यावेतन देण्यासही या वेळी मान्यता देण्यात आली.

## उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या उपायांना मंजुरी

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या उपायांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने सुधारित आकृतीबंधास तसेच विभागाचे एकात्मिक नियंत्रण कक्ष उभारण्यास मान्यता देण्यात आली.

उत्पादन शुल्काच्या दरातील वाढ व अनुषंगिक एमआरपी सूत्रातील बदल यामुळे १८० मिली बाटलीचे दर देशी मद्य ८० रुपये, महाराष्ट्र मेड लिकर १४८ रुपये, भारतीय बनावटीचे विदेशी मद्य २०५ रुपये आणि विदेशी मद्याचे प्रीमियम ब्रँड ३६० रुपये असे असतील. याशिवाय महाराष्ट्र मेड लिकर (एमएमएल) हा धान्याधारित विदेशी मद्याचा नवीन प्रकार तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये फक्त महाराष्ट्रातील मद्य उत्पादक असे उत्पादन करू शकतील. त्यांना या नव्या प्रकारातील उत्पादनाची (ब्रँड) नवीन नोंदणी करून घेणे आवश्यक राहील.

मंत्रिमंडळ बैठकीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदे व पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदे अशा एक हजार २२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. विभागासाठी या विविध उपाययोजना राबविल्यानंतर मद्यावरील उत्पादन शुल्क व विक्री कराच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे १४ हजार कोटींची महसूल वाढ अपेक्षित आहे.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी कार्यवाही करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार आगामी विधीमंडळ अधिवेशनात विधेयक आणण्यात येणार आहे.

सामाजिक न्यायाचे तत्व प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात २००५मध्ये अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली होती. केंद्र शासनामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग कार्यरत आहेत. त्यांच्याशी निगडीत विषय वेगवेगळे असल्याने या दोन्हींकरिता स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची शिफारस केंद्रीय जनजाती परिषदेने केली आहे. त्यानुसार राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने तयार केलेल्या विधेयकाच्या प्रारूप व पदांना मान्यता देण्यात आली.

## पाऊस, पीक, पेरणी, बियाणे, खतपुरवठ्याचा आढावा

राज्यात १५ जूननंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणीसाठा आदींचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीत कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या, खतपुरवठा याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्यातील १७ जिल्ह्यात २५ टक्केपेक्षा कमी, १२ जिल्ह्यात २५ ते ५० टक्के, चार जिल्ह्यात ५० ते ७५ टक्के, तर एका जिल्ह्यात शंभर टक्केहून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागात खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली, तर राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितले.

# ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील कुटुंबांना घरे देणार

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन
- सामाजिक न्याय विभागाच्या पुरस्कारांचे वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनामार्फत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. या प्रवर्गातील नागरिकांना गृहनिर्माणच्या विविध योजनांच्या माध्यमातून हक्काचे घर दिले जाते. केंद्र शासनाने या वर्षी ३० लाख घरे राज्याला उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे कोणीही व्यक्ती बेघर राहणार नाही. ग्रामीण भागात अनुसूचित जाती व जमातीमधील नोंदीत असलेल्या प्रत्येक कुटुंबाला या वर्षी प्राधान्याने घर देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १०) येथे सांगितले.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२३-२४ आयोजित पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मृद व जलसंधारण संजय राठोड, रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले, आमदार संतोष बांगर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. त्यात मानवता, समता, बंधूता आणि संधीची समानता आहे. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून घरोघरी संविधान हा उपक्रम राज्यात राबवण्यात येत असून त्यातून उद्देशिका प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचवली जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक अंतिम टप्प्यात असून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, क्रांतिगुरू लहूजी वस्ताद साळवे यांची स्मारके उभारण्याची कामेही वेगाने सुरू असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले. सामाजिक न्याय विभागाचा निधी त्याच विभागाच्या उद्दिष्टपूर्तीसाठीच वापरण्यात येत आहे, असे स्पष्ट करत त्यांनी समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून समाजकार्य करणाऱ्यांचे कौतुक होते तसेच महामानवांचे स्मरणही होते. चांगल्या कार्याचा गौरव झाल्यास समाजात सकारात्मक प्रेरणा मिळते. यापुढे हा पुरस्कार सोहळा दरवर्षी घेतला जाईल.

मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, आपल्याला मिळालेला पुरस्कार हा आपण केलेल्या कार्याचा गौरव आहे. या पुरस्कारांसाठी राज्यभरातून ८००हून अधिक अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १३० जणांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये ९० व्यक्ती व ४० संस्थांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार समाजकल्याण प्रभारी आयुक्त प्रवीण पुरी यांनी मानले.

## निवडक

### ऑस्ट्रियातील शाळेत विद्यार्थ्याकडून अंदाधुंद गोळीबार, नऊ जण ठार

**ग्राझ** : ऑस्ट्रियातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर ग्राझमधील शाळेत एका विद्यार्थ्याने अंदाधुंद गोळीबार केला आणि शेवटी वॉशरूममध्ये जाऊन स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेत सात विद्यार्थ्यांसह एक शालेय कर्मचारी व स्वतः आरोपी अशा नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. हल्लेखोर विद्यार्थी हा बंदूक घेऊन शाळेत पोहचला आणि त्याने समोर दिसेल त्याच्यावर गोळीबार सुरू केला. घटनेत काही लोक जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### राज्यातील शाळांच्या वेळापत्रकात बदल

**मुंबई** : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ची सुरुवात येत्या १६ जूनपासून होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळांच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षामध्ये राज्यातील शाळा सकाळी ७ऐवजी ९ वाजता भरतील आणि सायंकाळी ४ वाजता सुटतील. म्हणजेच सकाळी ९ ते सायंकाळी ४ ही शाळेची वेळ असणार आहे. राज्यातील ११ जिल्हे वगळता सगळीकडे शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहेत.

## जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजप आणि एनडीसोबत

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६वा वर्धापन दिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. १०) पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात साजरा झाला. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले.




उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, मला आजही १० जून १९९९ हा दिवस आठवतो. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि इतर काही मान्यवरांनी एकत्र येत राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली. तेव्हापासून आजपर्यंत पक्षाने कधीही मागे वळून पाहिले नाही, पण आपल्या पक्षाला कधीही बहुमत मिळाले नाही. आपल्याला नेहमीच सत्तेत भागीदार व्हावे लागले. २०१९ साली आपल्या पक्षाने शिवसेनेबरोबर सरकार स्थापन केले होते. तेव्हादेखील आपण सत्तेसाठी काही तडजोडी केल्या होत्या.

विरोधी पक्षात बसून आणि घोषणा देऊन चालत नाही. आपण लोकांचे प्रश्न सोडवणारे आणि बेरजेचे राजकारण करणारे लोक आहोत. त्यातूनच आपण भाजप आणि एनडीएबरोबर जाण्याचा निर्णय घेतला, असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, तिकडे स्पेक्युलर विचारांचे चंद्रबाबू नायडूदेखील भाजपबरोबर आलेले आहेत. एकेकाळी ममता बॅनर्जी याही एनडीएबरोबर होत्या तसेच लालूप्रसाद यादव हेदेखील एकेकाळी एनडीएबरोबर होते. शेवटी काय असते की राज्याचा विकास झाला पाहिजे. तरीही आता काही जण महायुतीचे सरकार आल्यापासून आपली बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# ‘एमकेसीएल’च्या करिअर मार्गदर्शन शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्त्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या वयाच्या ७५व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले असून त्या निमित्ताने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच उपक्रमांतर्गत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) पनवेलच्या वतीने येथील महापालिका क्षेत्रातील इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ‘भरारी २०२५’ हे करिअरविषयक मोफत मार्गदर्शन शिबिर मंगळवारी (दि. १०) पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.




पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रमुख मान्यवर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराला एमकेसीएलचे कोकण विभाग समन्वयक जयंत भगत, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत, पुणे एमकेसीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक नटराज कटकधोंड, स्वाती जयंत भगत, एमएसआयसीटीचे विविध विभागातील अधिकृत केंद्रप्रमुख तसेच विद्यार्थ्यांसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वतःच्या संघर्षमय कारकिर्दीची गाथा विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यांनी आपले करिअर कसे घडवले याबद्दलची माहिती देत विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरणा दिली आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या शिबिरात प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक, लेखक व व्याख्याते प्रा. विजय नवले यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअरच्या संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. आधुनिक युगात केवळ पारंपरिक क्षेत्रांपुरते मर्यादा न राहता नवीन क्षेत्रांमध्येही भरपूर संधी उपलब्ध आहेत हे त्यांनी उदाहरणांसह समजावून सांगितले. **(पान २ वर..)**

# रायगडातील शाळांमध्ये १६ जूनला प्रवेशोत्सव

### पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मिळणार पाठ्यपुस्तके व गणवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

येत्या सोमवार (दि. १६)पासून २०२५-२६ या नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्यात शिक्षण विभागाची जय्यत तयारी सुरू असून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव होणार आहे. यानिमित्ताने शाळांचा परिसर सजविण्यासोबत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभातफेरी, पुस्तके तसेच गणवेश वाटप करण्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

रायगडात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात येत आहे. शासनाच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने



पुस्तकांची मागणी केली होती. त्यानुसार पुस्तके प्राप्त झाली असून ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुख आणि केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सूपूर्द करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या एक लाख ८१ हजार ५४८ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे, तर ९८ हजार ५७२ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी शाळांना तोरणे लावण्यात येणार आहेत, रांगोळ्या काढण्यात येतील. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याकरिता गावात, वॉर्डात प्रभातफेरीही काढण्यात येणार आहे.

### एकही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये यासाठी नियोजन

जिल्ह्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत पावले उचलण्यात येत आहेत. १६ जून रोजी शाळा सुरू होणार आहेत. त्यापूर्वी ६ ते १४ वयोगटातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये यासाठी प्रवेशपात्र बालकांच्या याद्या ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शित करण्यात येणार आहेत. प्रवेशपात्र बालकांची यादी लाऊडस्पीकरवर घोषित करून शैक्षणिक पदयात्रा व शिक्षकांच्या गृहभेटी व सरपंच, गावकरी, व्यवस्थापन समिती सदस्य, युवक, बचत गट, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांच्या गृहभेटींचे नियोजन करण्यात आले आहे.

## प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करा -जयंत पाटील

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापन दिन मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्याला प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती केली.

पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना जयंत पाटील म्हणाले, पक्षाने मला बरीच संधी दिली आहे. सात वर्षांचा कालावधी दिला. आता नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे. आजवर मिळालेल्या सहकार्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार मानतो. त्यानंतर पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेल्या भाषणात जयंत पाटील यांची विनंती मान्य केली आणि या संदर्भातील निर्णय सामूहिकपणाने घेऊ, असे म्हटले.

# राष्ट्रवादीचे नेते सत्यजित पाटणकर भाजपमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजित पाटणकर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह मंगळवारी (दि. १०) भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे राष्ट्रवादीला वर्धापन दिनीच साताऱ्यात खिंडार पडले आहे.




भाजपच्या मुंबई येथील प्रदेश मुख्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले, भाजप सातारा जिल्हाध्यक्ष आमदार अतुल भोसले, भरत पाटील, नरेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रवादीचे नेते सत्यजित पाटणकर यांच्यासह कोयना शिक्षण संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर, सातारा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हिंदुराव पाटील, सातारा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेश पवार, पाटण पंचायत समितीचे माजी सभापती राजाभाऊ शेलार, पाटण नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष सचिन कुंभार, पाटण अर्बन बँकेचे माजी चेअरमन दिनकर घाडगे, पाटण तालुका दूध संघाचे चेअरमन सुभाष पवार, युवा नेते अभिजीत पाटील, राजे संघर्ष प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश पाटणकर, माजी उपसभापती रमेश मोरे, पाटण अर्बन बँकेचे व्हाईस चेअरमन रवींद्र ताटे, पाटण अर्बन बँकेचे चेअरमन बाळासाहेबराजे महाडिक, पाटण तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन अविनाश जानुगडे, खरेदी विक्री संघाचे व्हाईस चेअरमन हणमंतराव खबाले-पाटील, माजी उपसभापती प्रताप देसाई, शंकर शेडगे, समीर कदम, साहेबराव गायकवाड, निवास शिंदे, अमर पवार आदी पदाधिकाऱ्यांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी भाजपचे कमळ हाती घेतले. या सर्वांचे पक्षात स्वागत करण्यात आले.

# कारागृहात निर्मित वस्तूंच्या विक्री व प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई, : प्रतिनिधी**

कारागृहातील बंदीजनांकडून निर्मित वस्तूंच्या विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले. यावेळी गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ पंकज भोयर उपस्थित होते.




प्रदर्शनाचे आयोजन १० ते १२ जून २०२५ या कालावधीत त्रिमूर्ती प्रांगण, मंत्रालय येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनात असलेल्या वस्तूंची विक्रीही करण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृह, कोल्हापूरमधील कळंबा मध्यवर्ती कारागृह, नागपूर मध्यवर्ती कारागृह, अमरावती मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, ठाणे मध्यवर्ती कारागृह, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह या कारागृहातील बंदीजनांकडून निर्मित वस्तूंचा समावेश आहे.

अतिशय माफक दरात उच्च दर्जाच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

या प्रदर्शनामध्ये बंदीजनांकडून सागवान लाकडापासून तयार केलेले विविध प्रकारचे फर्निचर, देवघर, शोभेच्या वस्तू, कपडे, हातरुमाल, टॉवेल, बेडशीट, चादरी, सतरंज्या, साड्या, बेकरी पदार्थ, बिस्कीट, तसेच इतर सर्व दैनंदीन वापराच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

त्रिमूर्ती प्रांगण, मंत्रालयात कारागृहातील बंदीजनांकडून निर्मित वस्तूंच्या प्रदर्शनाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध मंत्र्यांनी भेटी देऊन वस्तूंची खरेदी केली.

प्रदर्शनाला कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर यांनीही प्रदर्शनातील स्टॉलला भेट देऊन पाहणी करीत काही वस्तुंची खरेदीही केली. यावेळी प्रधान सचिव अपील व सुरक्षा (कारागृह) राधिका रस्तोगी, अप्पर पोलीस महासंचालक कारागृह डॉ. सुहास वारके, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग, गृह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# मुरूड आगारात गॅस पंप होण्यासाठी खासदार तटकरे यांच्याकडे मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड आगाराला गॅस पंप नसल्याने अलिबाग येथील गॅस पंपावर गर्दी असल्याने मुरुड येथील गाड्यांना पंपावर किमान एक तासापेक्षा जास्त वेळ लागत असल्याने पर्यटक व स्थानिक यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.तेव्हा मुरुड आगारात गॅस पंप तत्काळ सुरू करून मुरुड तालुक्यातील नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे केली आहे.

मुरुड हे पर्यटन स्थळ असून येथे सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला व मौजमजा करण्यासाठी लाखो पर्यटक येत असतात. सर्वच पर्यटक आपल्या चार चाकी गाड्या आणत नाहीत तर काही एस टी वाहतुकीवर अवलंबून असतात.मुरुड मुंबई



फेऱ्या जास्त असून येथून मोठ्या संखेने पर्यटक व मुंबई स्थित स्थानिक नागरिक येत असतात.परंतु मुरुड आगारात गॅस पंप नसल्याने अलिबाग येथे जावे लागते .मुरुड येथील गाड्यांना पंपावर किमान एक तासापेक्षा जास्त वेळ थांबावे लागते.

खासदार सुनील तटकरे हे एका कार्यक्रमासाठी आले होते यावेळी त्यांनी ही व साळाव पुलावरून बी एस ६ या १६ टन वजनी गाड्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता यांनी नारकर प्रमाणपत्र एस टी विभागास द्यावे जेणेकरून मुरुड आगाराला नवीन गाड्या मिळतील.यासाठी तटकरे साहेब यांनी सहकार्य करावे अशी मागणी केली

यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात एका विशेष सभेचे आयोजन केले असून सर्व शासकीय अधिकारी यांच्यासमवेत सर्व गॅस कंपन्यांच्या अधिकारीवर्गास बोलावले असून मुरुड आगारात त्वरित गॅस पंप देण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी अध्यक्ष फैरोज घलटे,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते मनोज भगत,सोशल मिडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन,माजी सरपंच अजित कासार,माजी शिक्षण सभापती नितीन पवार,विजय भोय आदी उपस्थित होते.

# नेरूळ एलपी येथे रात्रीच्या वेळी रिक्षाचालकाकडून प्रवाशांची आर्थिक लूट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुलाच्या सुट्ट्या संपल्या. काही शाळा सुरु झाल्या आहेत तर काही शाळा- कॉलेज सुरु होणार आहेत. त्यामुळे गावाकडून शहरात येणाऱ्यांची संख्या जून महिन्यात मोठी असते. नवी मुंबई शहरात विशेषतः नेरुळ एल पी इथं रात्रीच्या वेळीस येणाऱ्या प्रवाशाची संख्या जास्त आहे.या ठिकाणाहुन इच्छित स्थळी जाणाऱ्या प्रवाशांकडून रिक्षा चालक मनमानी पद्धतीने भाडे आकारत असून अशा रिक्षा चालकावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

नवी मुंबई शहरात गावाकडून येणाऱ्या नागरिकांकडून रात्रीच्या वेळी मनमानी पद्धतीने भाडे आकारले जात आहे. एस टी वा खाजगी वाहनातून दररोज रात्री नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रवाशी उतरत असतात. विशेषतः नेरुळ एल पी ठिकाणी उतरून आपल्या जवळील सामान आणि मुला - बाळासह उतरणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. हे सर्व प्रवाशी पहाटे दोन -तीन वाजल्यापासून उतरत असल्याने या प्रवाशांना कमी पैशात सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या ट्रेन वा बसेस उपलब्ध नसतात.

परिणामी, एल पी नेरुळ येथे



उतरून दूरवर असलेल्या उलवे, उरण आणि सिवूड्स येथील प्रवाशांना घरी जाण्यासाठी रिक्षा शिवाय अन्य पर्याय नसतो.याचा फायदा एल पी येथे कार्यरत असलेली काही रिक्षा चालकाची टोळी घेत असून ते वाहतुकीचे सर्व नियम फाट्यावर मारत प्रवाशांची आर्थिक लूट करत असतात. रात्रीच्या वेळी आवाजवी भाडे आकारात प्रसंगी अधिक भाडे देण्यास नकार देणाऱ्या प्रवाशांना काही रिक्षा चालक दादागिरी करत असल्याच्या तक्रारी येत आहेत. उलवे येथे जाणाऱ्या प्रवाशाकडून ३००,उरण ४५० सिवूड्स २००, नेरुळ क्षेत्र एक आणि दोन मध्ये भाडे सुमारे ४० होत असताना ८० रुपये घेतले जाते. अशा रिक्षा चालकावर आरटीओ आणि नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

नेरुळ एल पी या ठिकाणाहून जुईनगर, सिवूड्स, नेरुळ क्षेत्र दोन आणि तीन तसेच उलवे, उरण आदी लांब पल्याची भाडी असले की, त्यांच्या कडून मिटर प्रमाणे पैसे न घेता मुह बोली भाडे आकारतात. अशा वेळी भल्या पहाटे बस वा अन्य सुविधा नसते. त्यामुळे रिक्षा शिवाय प्रवाशाना पर्याय नसतो. मात्र याचा फायदा काही मुजोर रिक्षा चालक घेत असून त्यांच्याकडून प्रवाशांची मोठया प्रमाणात लूट होत असल्याचे निदर्शनास येते. मीटर न टाकता रिक्षा चालक मनमर्जीने भाडे घेत असल्याचे दिसते. रात्रीची वेळ असल्याने प्रवाशीही गुपचुप पैसे देतो. नेरुळ एल पी प्रमाणे शहरातील सीबीडी,सानपाडा हायवे,वाशी हायवे, रबाळे नाका , कोपरखैरणे आदि ठिकाणी देखील रिक्षा चालका कडून मनमानी भाडे घेतले जात आहे.

**नवी मुंबई पोलीस वाहतूक शाखेच्या वतीने सार्वजनिक ठिकाणी काही अनुचित प्रकार घडू नये नये यासाठी अलर्ट असतो. वाहतूक विभागाचे गस्ती पथक मोक्याच्या ठिकाणी महामार्गावर तैनाती असते. काही आकस्मिक घटना घडल्यास नागरिकांनी ११२ हा मोबाइल नंबर डायल करावा. त्वरित मदत मिळते. -तिरुपती काकडे** , नवी मुंबई पोलीस उपायुक्त (वहातुक)

# कर्जतमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेसचा वर्धापन दिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेसचा २६ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कर्जत व खालापूर तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात पक्ष स्थापनेच्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी माजी समाज कल्याण सभापती नारायण डामसे, प्रदेश सरचिटणीस भरत भगत प्रदेश सचिव अशोक भोपतराव, जिल्हा सचिव दीपक श्रीखंडे, विधानसभा महिला अध्यक्षा सुरेखा खेडकर, खालापूर तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, कर्जत तालुका महिला अध्यक्षा ॲड. रंजना धुळे, माजी नगर सेवक सोमनाथ ठोंबरे, शहर युवक अध्यक्ष सोमनाथ पालकर, रवींद्र झांजे, शरद हजारे, तालुका युवक अध्यक्ष ॲड. स्वप्नील पालकर, अल्पसंख्यांक सेलचे अमीर माणियार आदी उपस्थित होते. याप्रसंगी सुधाकर घारे आणि अशोक भोपतराव यांनी मनोगते व्यक्त करून कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या.

शहापूरचे आमदार दौलत दरोडा यांनी संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे, तालुका कार्याध्यक्ष दीपक सापळे, तालुका युवक अध्यक्ष दिनेश चंदे, विभागीय अध्यक्ष शांताराम निचिते, आदिवासी सेल उपाध्यक्ष भगवान देसले, तालुका सरचिटणीस सतीश सासे आदी उपस्थित होते.



# राज्यात मान्सून रखडला

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या दोन आठवड्यांपासून मान्सूनचा प्रवास रखडलेला असून, १५ जूनपर्यंत तरी मान्सूनसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही.

राज्यात गेल्या दोन आठवड्यांपासून मान्सूनचा प्रवास रखडलेला असून, १५ जूनपर्यंत तरी मान्सूनसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही. त्यामुळे तापमानात मोठी वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील भागात ४० अंशांपेक्षा जास्त तापमान राहणार आहे. पूर्व विदर्भात तापमान ४५ अंशांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

राज्यात १४ जूनपर्यंत पावसाची शक्यता कमी असून, फक्त काही भागात दुपारनंतर मेघगर्जनेसह हलक्या स्वरूपाचा पाऊस होईल. मुख्यतः दक्षिण मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातच थोडाफार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, विदर्भात मान्सूनची साधारणपणे १० ते १५ जून दरम्यान आगमन होते. यंदा मान्सून लवकर दाखल झाला, पण प्रतिकूल हवामानामुळे तो पुढे सरकू शकलेला नाही. बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात पूरक स्थिती नसल्याने उत्तरेकडून गरम वारे वाहत आहेत, ज्यामुळे उष्णतेत मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीस घाई न

# रेवदंडा बाजारपेठेत पार्किंग असुविधेने नित्याची वाहतूक कोंडी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला कुठेही पार्किग सुविधा नसल्याने जा-ये करणारा वाहनांना बाजारपेठेत बेशिस्तीने पार्किग केलेल्या वाहनाचा अडथळा होतो, व वाहतुक कोंडी निर्माण होते.

अलिबाग,मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून वाहनांची जा-ये मोठया प्रमाणात आहे, विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस असल्याने येथून पर्यटक मोठया प्रमाणात येत असतात, त्यांना रेवदंडा मार्गेच मुरूडकडे जा-ये करावी लागते. रेवदंडा बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये वसलेली आहे, या बाजारपेठेतील रस्ता अंत्यत अंरूद आहे . त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा ताण रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला नेहमीच असतो.रेवदंडा बाजारपेठेतील अगोदरच अरूंद असलेल्या रस्ता वाहनांची जा-ये करताना नित्याने वाहने व प्रवासीवर्गाला वाहतुक कोडींच्या



समस्येला सामोरे जावे लागते.

रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग,मुरूड व रोहा तालुक्यातील गावे, व रेवदंडा पंचक्रोशीतील गावे अवंलबून आहेत, त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्याने गर्दीचे ठिकाण आहे. येथे बाजारपेठेत खरेदीसाठी नित्याची गर्दी असते, बाजारपेठेतील अरूंद रस्तात मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने बेशिस्तीने पार्किग केली जातात, त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याने जा-ये करणार्या मोठया बसेस, मालवाहतुक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो, त्यामुळे वाहतुक कोंडी नित्याने होते. मुख्यः रस्ता अरूंद असल्याने पार्किग समस्या सुध्दा निश्चितच जाणवते.

रेवदंडा बाजारपेठेतील गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुल या एक किमी अरूंद रस्त्याच्या अंतरामध्ये कुठेही पार्किग सुविधा नसल्याने ही वाहतुक समस्या निर्माण होते. रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद असलेल्या रस्ताला पार्किग सुविधा नसल्यानेच वाहतुक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते, बाजारपेठेत खरेदी साठी मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने येत असतात, त्यांना पार्किग सुविधा नसल्याने बेशिस्तीने वाहतुक कोंडी निर्माण होते.

पान १ वरुन

## एमकेसीएलच्या करिअर मार्गदर्शन शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

याचबरोबर इंजिनिअरिंग, वैद्यकीय, व्यवस्थापन, आर्ट्स, कॉमर्स, लॉ, डिझाईन, मीडिया, उद्योजकता, स्पर्धा परीक्षा अशा विविध क्षेत्रांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी आपली आवड, क्षमता आणि बाजारातील गरज यांचा समतोल साधून करिअरची दिशा निवडावी, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संयोजन पनवेलमधील एमएस-सीआयटी केंद्रांनी केले. शिबिराच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि भविष्यात असे उपक्रम अधिक प्रमाणात आयोजित करण्याची मागणी केली.

# जसखार ग्रामपंचायत उपसरपंचपदी युतीच्या हेमलता भालचंद्र ठाकूर

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात प्रसिद्ध व श्रीमंत समजली जाणारी ग्रामपंचायत जसखार उपसरपंच जागा रिक्त झाल्यामुळे सोमवार (दि.०९)रोजी झालेल्या मिटिंगमध्ये शिवसेना-भाजप युतीच्या हेमालता ठाकूर या निवडणुकीत विजयी झाल्या आहेत.

या विजयामध्ये उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांचे तसेच शिवसेना (शिंदे गट)रायगड जिल्हाप्रमुख अतुल भगत यांचे विशेष सहकार्य लाभले. युवा सामाजिक संस्था आणि शिवसेना शाखा जसखार यांच्या माध्यमातून उपस्थित सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. या निवडणुकीचे किंगमेकर राकेश तांडेल व सचिन घरत ठरले आहेत.

जसखार ग्रामपंचायत उपसरपंच पदी हेमलता भालचंद्र ठाकूर यांची निवड




झाल्याने दिपक ठाकूर तालुकाप्रमुख उरण, सुरेश म्हात्रे कामगार नेते, निशांत ठाकूर मनसे अध्यक्ष, नितीन पाटील माजी सरपंच,अमित ठाकूर उपतालुकाप्रमुख, ग्रामपंचायत सदस्या सीमा ठाकूर, वैजयंती ठाकूर, धनवंती ठाकूर, दमयंती म्हात्रे, युवा सामाजिक संस्था अध्यक्ष हर्षल ठाकूर, खजिनदार मयूर तांडेल, रितेश म्हात्रे, भालचंद्र ठाकूर, जनार्दन म्हात्रे, सतीश वाजेकर, मेघनाथ ठाकूर शाखाप्रमुख यांनी शुभेच्छा दिल्या

# भाजप खारघर मंडळ उपाध्यक्ष रमेश खडकर यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भाजपच्या खारघर मंडळाचे उपाध्यक्ष रमेश गोविंद खडकर यांचे वयाच्या ५६व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर खारघर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे व एक मुलगी आहे.

रमेश खडकर यांच्या निधनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी शोक व्यक्त करून म्हटले की, रमेश खडकर यांच्या जाण्याने भाजपच्या कार्यसंघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ते एक निष्ठावान, कर्तव्यनिष्ठ आणि समाजासाठी नेहमी झटणारे कार्यकर्ते होते. त्यांचा मनमिळावू स्वभाव, कार्यावरील निष्ठा आणि संघटनेबद्दलची श्रद्धा ही सर्वांसाठी प्रेरणादायी होती. त्यांच्या कार्याचा मार्ग आम्हा सर्वांसाठी दीपस्तंभासारखा राहील. या दुखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची ताकद देवो, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे.

# शहापूर जीवरक्षक टीम धावली महावितरणच्या मदतीला

**कल्याण : प्रतिनिधी**

रविवारी मध्यरात्री अचानक जोराचा वारा सुटल्याने आसनगावला वीजपुरवठा करणारी उच्चदाबाची वीजवाहिनी तुटून वैतरणा नदी पात्रात पडली. नदीपात्र खोल असल्याने दुरस्तीच्या कामात अडथळे येत होते, परंर्ती शहापूरच्या जीवरक्षक टिमने मदत केल्याने सोमवारी सकाळी वीजुपरवठा सुरळीत करता आला.

जीवरक्षक टिमचे समीर चौधरी यांच्याशी संपर्क करून नदीपात्रात काम करण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्पीडबोटीची मागणी केली. या मागणीला प्रतिसाद देत चौधरी यांनी तन्मय निमसे व इतर सहकाऱ्यांसमवेत बोट उपलब्ध करून दिली.

## दुखवटा

### तुलसीदास भवानी



**पनवेल :** येथील सर्वात मोठ्या महादेव सॉ मिलचे सर्वेसर्वा, कच्छ कडवा पाटीदार समाजाचे माजी अध्यक्ष, लायन्स क्लब खांदेश्वरचे माजी अध्यक्ष तुलसीदास भवानी (वय ७८) यांचे रविवारी (दि.८) निधन झाले. त्यांनी आपल्यासह सर्व भावंडांना उद्योगामध्ये नावारूपाला आणले. कै. तुलसीदास भवानी यांची शोकसभा बुधवारी (दि.११) पनवेलच्या विश्राळी नाका येथील सिंधी पंचायत हॉलमध्ये होणार आहे.

# कळंबोलीत पालिकेकडून हातगाड्यांवर कारवाई

**कळंबोली : बातमीदार**



आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक रस्ता अडवून नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या कळंबोली परिसरातील हातगाड्यांवरती मंगळवारी (दि.१०) अतिक्रमण विरोधी पथकाच्या वतीने तोडक कारवाई राबविण्यात आली.

वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण कायम ठेवणाऱ्या पाच हातगाड्यांवर प्रभाग अधिकारी श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती 'ब' अंतर्गत या तोडक कारवाई करण्यात आली. या वेळी प्रभाग समिती 'ब' चे प्रभारी अधीक्षक मनोज चव्हाण, अतिक्रमण विरोधी पथक व प्रभागाचे संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

सिटी हॉस्पिटल, कळंबोली परिसरातील यापूर्वी तोडण्यात आलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्या पुन्हा त्याच ठिकाणी उभारल्याचे निदर्शनास आले होते. या झोपड्यांवर तोडक कारवाई ऐवजी झोपडपट्टी धारकांना स्वतः झोपड्या हटविण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, झोपडपट्टी धारकांनी स्वतः चे साहित्य व झोपड्या अतिक्रमित जागेवरून हटवून महापालिकेस सहकार्य केले.

या कारवाईदरम्यान सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती ब, अतिक्रमण विरोधी कारवाई पथक तसेच प्रभाग कर्मचारी उपस्थित होते. कोणतीही तोडक कारवाई न करता ही कार्यवाही यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.

कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी याची तातडीने दखल घेऊन त्या भागात गस्त घालणाऱ्या अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांना सांगून पाच हातगाड्यात जप्त केल्या व त्या हातगाड्या जेसीबीच्या साह्याने तोडून नामशेषही करण्यात आल्या. महापालिकेने केलेल्या या कारवाईचे कळंबोलीतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच कळंबोली पूर्ण हातगाडी मुक्त करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## पत्नीची हत्या करून पतीने केली आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या करून पतीने आत्महत्या केल्याची घटना खारघर येथील सेक्टर ३४ मधील डॉल्फीन प्राईड सोसायटीत एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

नोतन ऊर्फ संजय सचदेव या पतीने आपली पत्नी सपना नोतन दास हिचा खून करून स्वतः आत्महत्या केली. प्राथमिक माहितीनुसार, हे दाम्पत्य मूळचे पाकिस्तानचे नागरिक असून, सहा महिन्यांपूर्वी ते पर्यटन व्हिसावर भारतात आले होते. त्यांच्यात सतत घरगुती वाद होत असल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले आहे. सकाळी त्यांची १० आणि सहा वर्षांची दोन्ही मुले शाळेत गेल्यानंतर नोतन सचदेवने स्वयंपाकघरातील चाकूने पत्नी सपनावर वार करून हत्या केली.

पत्नीचा खून केल्यानंतर त्याने स्वतः देखील आत्महत्या केली. मुले शाळेतून घरी परतल्यानंतर त्यांना हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रिक्षा-टॅक्सीचालकांच्या समस्या सोडवण्यासाठी भाजप पुरस्कृत संघटनेची आरटीओ अधिकाऱ्यांसोबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता पक्ष पुरस्कृत वंदे मातरम् जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि. १०) आरटीओ अधिकाऱ्यांसोबत पनवेलमधील रिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने मिटर रिकॅलिब्रेशन आणि गाडीच्या पासिंगसंदर्भात भेडसावणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकण्यात आला.

रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मिटर रिकॅलिब्रेशन करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी मिटर कॅलिब्रेशनसाठी आवश्यक असलेले सॉफ्टवेअर उपलब्ध नसल्यामुळे काम रखडते तसेच त्यांना तर काही ठिकाणी नवीन मिटर घेण्यासाठी सक्ती केली जात आहे. ही सक्ती चालकांवर अन्यायकारक असून या संदर्भात आरटीओ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

रिकॅलिब्रेशनचे सॉफ्टवेअर त्वरित उपलब्ध करून देण्याबाबत आदेश देण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली. याशिवाय कागदपत्रांच्या प्रक्रियेदरम्यान पैशांची मागणी केली जात असल्याबाबतही लक्ष वेधण्यात आले. यावरही तत्काळ लक्ष देऊन योग्य कार्यवाही करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली तसेच निवेदन देण्यात आले. त्याचप्रमाणे नवीन जीपीएस प्रणालीबद्दलही या बैठकीत माहिती घेण्यात आली.

या बैठकीला वंदे मातरम् जनरल कामगार संघटनेचे सचिव रवींद्र कोरडे, अंकुश पाटील, दीपक नावडेकर, दीपक म्हात्रे, संतोष म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, संतोष म्हात्रे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. या चर्चेमुळे रिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या समस्या मार्गी लागण्यास मदत होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.



**पनवेल : भारतातील कामगारांसाठी १० जून १८८० रोजी रविवारच्या सुट्टीसाठीचा निर्णय झाला होता. यासाठी लढा देणारे भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांचे स्मरण करून अभिवादन करण्यात आले. खांदा कॉलनी येथे झालेल्या या कार्यक्रमास आनंदी ग्रुपचे अध्यक्ष संजय पाटील, भाजप नवीन पनवेल मंडळ सरचिटणीस भीमराव पोवार, रामदास गोवारी, संजय पाटील (आसुडगाव), अरुण म्हसकर, सुरेश म्हात्रे, जयंत भगत, रमाकांत भगत आदी उपस्थित होते. दरम्यान, कार्यक्रमाच्या सुरुवातीला खांदा कॉलनीतील आनंदी ग्रुपचे सदस्य शर्मा यांच्या मुलाचे अकस्मात निधन झाले. याबद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली.**



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नीता माळी, उपाध्यक्ष दिलीप जाधव, चिटणीस कुणाल सांगानी, शैलेंद्र त्रिपाठी, ज्येष्ठ नागरिक सेलचे अध्यक्ष नवनीन मारू, हर्षवर्धन पाटील, नरसिंग वासाणी, प्रवीण चोपडा, गिरीश संघाली, गणेश सांघले आदी उपस्थित होते.**

## निवडक

### पुष्पक नगर येथून व्यक्ती बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक व्यक्ती कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे. नागनाथ जीवनाजी घावस (वय ४०, रा. पुष्पक नगर), उंची पाच फूट चार इंच, बांधा सडपातळ, रंग निम गोरा, चेहरा उभट, केस काळे, नाक बसके असून अंगात निळा शर्ट व काळी पॅन्ट आहे. त्याला मराठी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.हवा देवेंद्र म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तरण तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** शहरातील कर्नाळा स्पोर्ट्स ॲकेडमी येथील तरण तलावात आपल्या मित्रासह पोहण्यास गेलेल्या एका १८ वर्षीय तरुणाचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अनिष अब्दुल अलीम शेख (रा. मानखुर्द) असे मयत तरुणाचे नाव असून या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाणे येथे आकस्मित मृत्यू म्हणून करण्यात आली असून पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांझुर्णे करीत आहेत.

## ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल ज्येष्ठ नागरिक संघाच्या गेल्या पंचवीस वर्षाच्या देदीप्यमान कामगिरीची दखल घेत कोटक लाईफ इन्शुरन्स कंपनीतर्फे काही निवडक सभासदांच्या त्यांच्या कामगिरीबद्दल निवृत्ती सन्मान सोहळा नुकताच नवीन पनवेल येथील कंपनीच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात दिनेश परब डिव्हिजनल मॅनेजर यांनी रायगड जिल्ह्यातील कंपनीच्या कामाचे स्वरूप, हजारो कोटींची उलाढाल आकडेवारिणीशी स्पष्ट स्वरूपात मांडली. विमा क्षेत्रात कंपनीची विस्वासार्हता, आपल्याला देण्यात येणारे फायदे, अनेक योजना त्यांनी सांगितल्या. केतन गोयल यांनीदेखील मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अनुप्रिया काळन, मानिनी पडवळ, स्मिता सराफ, सुनीता पाटील, दत्तात्रय जाधव, मोहन शिरोडकर, दत्ता ढोले, मधुकर नाझरे, प्रभाकर कानारे, लेखक व पत्रकार दिलीप रेडकर यांनी अनुभवाचा थोडक्यात आढावा घेतला.

सर्व ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. सोहळ्यासाठी कर्मचारी निशांत मानकामे, कल्पेश शिंदे आदींनी मेहनत घेतली.

# हॉर्न वाजवल्याच्या रागातून मारहाण

## चार तरुण अटकेत, दोन अल्पवयीन मुलांची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

मोटरसायकलवरून जाणाऱ्या दोन व्यक्तींनी तीन स्कुटीवरून रस्ता अडवून जाणाऱ्या सहा तरुणांना हॉर्न वाजवून बाजूला होण्यास सांगितल्याने संतप्त झालेल्या सहा तरुणांनी मोटरसायकलरील दोन्ही व्यक्तींना बेदम मारहाण केल्याची घटना शनिवारी रात्री पनवेलमध्ये घडली.

या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी मारहाण करणाऱ्या या तरुणांचा शोध घेऊन त्यापैकी चार आरोपींना अटक केली आहे, तर त्यांच्या दोन अल्पवयीन साथीदारांना नोटीस बजावली आहे.

या घटनेतील तक्रारदार दीपक मोहिते (वय ४६) हे पनवेलच्या साई नगरमध्ये राहण्यास आहेत. रणधीरकुमार सिंग (वय ३६) या मित्रासह आपल्या मोटरसायकलवरून घरी जात होते. या वेळी सहा तरुण तीन स्कुटीवरुन संपूर्ण रस्ता अडवून, गप्पा मारत, रमतगमत जात असल्याने दीपक मोहिते यांनी हॉर्न वाजवुन त्यांना रस्ता सोडण्यास सांगितले. या गोष्टीचा स्कुटीवरील तरुणांना राग आल्याने त्यांनी दीपक मोहिते यांची मोटरसायकल अडवून त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर त्या सर्वांनी दीपक मोहिते व रणधीरकुमार या दोघांना भररस्त्यात लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत दोघे जखमी झाल्यानंतर सर्व तरुण आपल्या स्कुटीवरून पळून गेले.

या मारहाणीत रणधीरकुमार सिंग हे गंभीर जखमी झाले असून या दोघांनी रुग्णालयात उपचार घेऊन पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार व त्यांच्या पथकाने या गुह्याच्या तपासाला सुरुवात केली.

या गुह्यातील तरुण ज्या तीन स्कुटीवरून आले होते, त्यातील एका स्कुटीवर नंबर नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे पोलिसांनी दोन स्कुटीवरील नंबरच्या माध्यमातून शोध घेऊन दोन अल्पवयीन मुलांसह नवशाद नाशिर पटेल (वय २७), सनाल सलीम रासलकर (वय १९), अरमान अली शेख (वय १९) व रिहान रसुल बागवान (वय १८) या सहा जणांना ताब्यात घेतले. त्यानंतर यातील चार तरुणांना मारहाणीच्या गुन्ह्यात अटक केली. या चारही तरुणांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून दोन अल्पवयीन मुलांना नोटीस देऊन त्यांची सुटका करण्यात आले आहे.

# मोबाईल चोरून खात्यातून ७६ हजार लंपास

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये एका वाहन चालकाला रात्रीच्यावेळी दुकलीने लुटून त्या चालकाचे पाकीट व मोबाईल चोरी केले. चोरलेल्या मोबाईलच्या साह्याने चोरट्यांनी वाहनचालकाच्या बँक खात्यातून तब्बल ७६ हजार रुपये इतर खात्यात वळते केले.

रात्र झाल्यानंतर अनेक अवजड वाहन चालक स्वताकडील वाहने रस्त्याकडेला वाहन उभे करून तेथेच रात्र काढतात. याचाच फायदा घेऊन तळोजातील पेणधर गावाजवळील प्रिन्स काट्याजवळ रात्री एका वाहनचालकाला लुटण्यात आले. एका स्कुटीवरुन दोघे चोरटे तेथे आले.

गाडीच्या उघड्या खिडकीने प्रवेश करुन त्यांनी वाहनात झोपलेल्या चालकाचे पाकीट व मोबाइल असा १२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरला. त्यानंतर चालक दूसऱ्या दिवशी सकाळी वाहने घेऊन पेण येथे गेल्यावर त्यांना त्यांच्या खात्यामधून ७६ हजार रुपये इतर बँकेत वळते झाल्याचे समजले. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.



**उरण : पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटपौर्णिमेनिमित्त सुवासिनींनी वडाच्या झाडाची मनोभावे पूजा केली. शहरात नागाव, बोरी नाका, कोट नाका, राघोबादेव मंदिर, देऊळवाडी, केगाव, चिरनेर, स्वामी समर्थ मठ, आनंद नगर येथील वडाला फेऱ्या मारण्यासाठी महिलांची गर्दी दिसली.**


## संपादकीय

# सुसज्जतेची ११ वर्षे!

स्थितीशील भारत ते गतिशील भारत हे स्थित्यंतर मोदी सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात भारतीय नागरिकांनी अनुभवले आहे. गेल्या अकरा वर्षांत देशामध्ये जे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक बदल घडले, त्यांच्याकडे नुसती नजर टाकली तरीही हा सुखद बदल कुणालाही जाणवेल. अर्थात त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रगल्भ नेतृत्वाला दाद देण्याचा उमदेपणा मात्र हवा.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली देशाच्या कारभाराची सूत्रे हाती घेतली, तेव्हा देशाची अवस्था काय होती हे आठवणीत न ठेवलेलेच बरे. असंख्य घोटाळे आणि उघड भ्रष्टाचाराने बरबटलेली सारी व्यवस्था असे विदारक चित्र युपीएच्या दुसऱ्या टर्ममध्ये बघायला मिळाले. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे अर्थशास्त्राचे उत्कृष्ट जाणकार होते. भारताला आर्थिक खुलेकरणाच्या माध्यमातून प्रगतीच्या दिशेने मोकळे सोडणाऱ्या मनमोहन सिंग यांनी खूप मोठे योगदान दिले हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. तथापि युपीए-२च्या राजवटीत हेच बुद्धिमान डॉ. सिंग हतबल पंतप्रधानाच्या रूपात समोर आले. त्यानंतर देशाच्या जनतेने निर्णायक पवित्रा घेत भारतीय जनता पक्षाची राजवट सत्तेवर आणली. तिथून पुढे जणु कालचक्रच वेगाने फिरू लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आल्याआल्याच पहिला निर्णय काळ्या पैशाच्या उच्चाटनासंदर्भात घेतला. देशभर स्वच्छता मोहीम राबवली. सैनिकांसाठी 'वन रँक वन पेन्शन' योजना जारी केली. ट्रिपल तलाकसारखे विधेयक आणून मुस्लिम महिलांवरील शेकडो वर्षांचा अन्याय दूर केला. देशभरात कोट्यवधी शौचालये बांधली. देशभरातील महिलांसाठी मोफत गॅसची शेगडी आणि सिलेंडर पुरवण्याची व्यवस्था केली. इतकेच नव्हे तर कोट्यवधी गरीब नागरिकांसाठी जनधन खाती सुरू केली. बँकेत खाती उघडून ते थांबले नाहीत, तर शेतकऱ्यांच्या खात्यात केंद्रीय योजनांच्या रकमा थेट पडू लागल्या. पंतप्रधान मोदी यांनी सुरू केलेला विकासाचा हा यज्ञ धडधडा पेटलेला पाहून जगभरातील बड्या सत्ताही अचंबित झाल्या. भारताची आर्थिक घडी नीट बसवण्यात मोदी सरकारला लक्षणीय यश आले. आजवरची सर्वाधिक परकीय गुंतवणूक गेल्या ११ वर्षांतच भारतात आली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरीकडे, शेकडो वर्षे भिजत पडलेला अयोध्येतील राममंदिराचा प्रश्न याच काळात सर्वोच्च न्यायालयात सुटला आणि पाहता पाहता अयोध्येत रामलल्ला विराजमान देखील झाले. 'मंदिर वहीं बनाएंगे' हा भाजपचा नुसता नारा नव्हे तर कोट्यवधी हिंदूंचा संकल्प होता. त्या संकल्पाची पूर्ती झाली. उरी, बालाकोट येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला सडेतोड उत्तर देत पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कराने सर्जिकल स्ट्राइक करून कुरापतखोर पाकिस्तानला पाणी पाजले. जम्मू-काश्मीर खोऱ्यातील ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय हा मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या राजवटीतला मानबिंदू ठरला. काश्मीरमध्ये प्रथमच विकासाचे वारे वाहू लागले. चिनाब नदीवरील जगातील सर्वात उंच पुलाचे लोकार्पण पंतप्रधानांनी काही दिवसांपूर्वीच केले ते याचेच द्योतक होय. पहलगाम येथे घडलेल्या देशी पर्यटकांच्या निर्घृण हत्याकांडानंतर पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे नेस्तनाबूत करून मोदींच्या भारताने आपले पोलादी पाणी साऱ्या जगाला दाखवले. ऑपरेशन सिंदूरबद्दल भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी देशोदेशी गेलेल्या शिष्टमंडळांमध्ये विरोधीपक्षांचे नेते देखील होते. जगभरात पंतप्रधान मोदी यांचे कौतुक ऐकून त्यांनाही गेल्या ११ वर्षांमध्ये भारताने केलेल्या विकासयात्रेची जाणीव नक्कीच झाली असेल.**

# लोकप्रिय साहित्यिक साने गुरुजी





साने गुरुजी हे नाव कोणाला माहित नाही असे नाही कारण हे नाव सर्वांना माहित आहे कारण ते एक लोकप्रिय साहित्यिक होते आणि त्यांच्या अनेक कविता आणि पुस्तके खूप प्रसिद्ध होती. आज त्यांचा स्मृतीदिन आहे, चला तर आता आपण साने गुरुजी यांच्याविषयी जाणून घेऊयात.

एक लोकप्रिय साहित्यिक म्हणून ज्यांची ओळख होती असे साने गुरुजी यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावामध्ये झाला होता. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पाडुरंग सदाशिव साने असे होते पण त्यांच्या अनेक चांगल्या आणि लोकप्रिय कवितांच्यामुळे, पुस्तकांच्यामुळे आणि लेखांच्यामुळे त्यांचे नाव साने गुरुजी असे पडले आणि आता त्यांना साने गुरुजी या नावानेच ओळखले जाते. साने गुरुजी यांच्या वडिलांचे नाव सदाशिव साने आणि आईचे नाव यशोदाबाई साने असे होते.

साने गुरुजी यांच्यावर त्यांच्या आईचा खूप प्रभाव होता आणि त्यांच्या आईने त्यांच्यावर चांगले संस्कार घडवले होते. साने गुरुजी यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमळनेर या ठिकाणी असणाऱ्या प्रताप या हायस्कूल मध्ये ते एक शिक्षक म्हणून काम करू लागले आणि मग त्यांनतर त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना आणि वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार कसा निर्माण करायचा तसेच या जगामध्ये सावाभिमानाने कसे जगायचे या बद्दल माहिती दिली किंवा मुलांना धडे दिले.

साने गुरुजी हे एक लोकप्रिय साहित्यिक तर होतेच परंतु यांना एक संवेदनशील स्वातंत्र्यसैनिक देखील होते आणि त्यांना देशाविषयी खूप अभिमान होता आणि ते एक महान देशभाकत देखील होते आणि त्यांनी स्वातंत्र्य लढ्यातील अनेक चळवळींच्यामध्ये भाग घेतला होता. साने गुरुजी यांनी इ. स. १९२८ मध्ये 'विद्यार्थी' मासिक चालू केले. साने गुरुजी यांना सामाज्यामध्ये असणाऱ्या अस्पृश्यता रुढींच्या बद्दल खूप चीड यायची आणि त्यांना वाटायचे कि ह्या सर्व परंपरा मोडीस काढल्या पाहिजे.

साने गुरुजी हे अस्पृश्यता रूढी (उदा : अस्पृश लोकांनी कोणत्याही मंदिरात जाऊ नये अशी पूर्वी प्रथा होती.) आणि समाजातील कर्मकांड या गोष्टींच्या विरोधात होते आणि त्यांना हे सर्व मोडून काढायचे होते म्हणून त्यांनी १९४६मध्ये त्यांनी पंढरपूरमधील विठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न केले आणि त्या प्रयत्नांना यश आले. त्यांनी पंढरपूरमधील विठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश मिळावा म्हणून उपोषण केले होते आणि या प्रयत्नांना यश मिळाले त्यांना मंदिरामध्ये प्रवेश मिळाला. तसेच त्यांनी एक संवेदनशील स्वातंत्र्य सैनिक म्हणून कामदेखील केले त्यांनी इ. स. १९३० त्यांनी करत असलेली नोकरी सोडून त्यांनी सविनय कायदेभंग या चळवळीमध्ये भाग घेतला.

याचबरोबर त्यांनी शेतकऱ्यांना दुष्काळ प्रसंगामध्ये करमुक्ती मिळावी म्हणून कॉंग्रेस या साप्ताहिकामध्ये लेख लिहून प्रयात केले. त्यांनी इ. स १९४२ मध्ये भूमिगत चळवळ आणि जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे झालेले कॉंग्रेसचे अधिवेशन यशस्वीरित्या पूर्ण करण्यास त्यांना यश मिळाले. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये आपल्या देशाला ब्रिटीशांच्यापासून स्वातंत्र्य मिळाले मग साने गुरुजींनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर त्यांनी समाजवादी पक्ष्यामध्ये प्रवेश मिळवला आणि मग त्यांनी इंटरऑपरेटिव्ह चळवळ चालू केली.

यामध्ये त्यांनी आपल्या देशातील लोकांना एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न केला म्हणजेच आपल्या देशामध्ये वेगवेगळ्या जातीचे, वेगवेगळ्या धर्माचे, वेगवेगळी भाषा बोलणारे, तसेच त्यांच्या परंपरेनुसार वस्त्र घालणारी असे लोक होते आणि साने गुरुजी यांनी इंटरऑपरेटिव्ह चळवळीमधून भारतातील वेगवेगळ्या जातीच्या, वेगवेगळ्या धर्माच्या आणि वेगवेगळ्या भाष्या बोलणाऱ्या अनेक लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आणि जरी आपली जात, धर्म वेगवेगळी असली तरी मानव हा एकच आहे आणि मानवता हाच खरा धर्म आहे असे त्यांनी सांगितले.

साने गुरुजी हे जरी स्वातंत्र्य सैनिक असले तरी ते एक चांगले साहित्यिक आणि लेखकदेखील होते आणि त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या लेखनाची आवड देखील होती. ज्यावेळी त्यांनी कविता लिहिण्यास आरंभ केला त्यावेळी त्यांनी अनेक कविता लिहिल्या आणि त्यांची पहिली कविता म्हणजे,

**बलसागर भारत होवो**
**विश्वात शोभूनी राहो**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले मी सिध्द माराया हो**

ते सतत कोणत्या ना कोणत्या साप्ताहिकातून लेख लिहायचे आणि त्यांचे त्यांनी सुरु केलेले पहिले साप्ताहिक म्हणजे 'विद्यार्थी' साप्ताहिक होते त्यानंतर त्यांना 'साधना' हे साप्ताहिक सुरु केले मग त्यांनतर त्यांच्या अनेक कविता, लेख, पुस्तके, कादंबरी यासारखे आणि साहित्य पाहायला मिळाले. त्यांनी अनेक पुस्तके लहिली असतील म्हणजेच त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली आहेत आणि त्यामधील त्यांचे लोकप्रिय पुस्तक म्हणजे श्यामची आई हे आहे आणि हे पुस्तक (कादंबरी) आजही तितकेच लोकप्रिय आहे. त्यांच्या साहित्यामध्ये समाज सुधारणा, मानवतावाद आणि देशभक्ती या विषयी साहित्य आहे म्हणजेच त्यांनी कविता, लेख, पुस्तके हि ह्याच विषयांच्यावर लिहिलेली आहेत.

साने गुरुजी यांना संस्कृत, मराठी, तमिळ, बंगाली आणि इतर काही भाषा येत होत्या. त्यांनी सलग १५ महिने कारावास भोगला होता आणि त्यांनी त्यांचे बऱ्यापैकी लेखन हे तुरुंगामध्ये असतानाच केले आहे. तसेच त्यांनी आणखीन एक कविता लिहिलेली होती आणि तीदेखील खूप लोकप्रिय आहे आणि ती म्हणजे,

**खरा तो एकची धर्म**
**जगाला प्रेम अर्पावे खख**
**जगी जे हीन अतिपतित**
**जगी जे दिन पददलित खख**

अश्या प्रकारे साने गुरुजींनी भारताच्या इतिहासामध्ये अनेक मोलाची कामगिरी केली. त्यांनी अनेक स्वातंत्र्य चळवळींच्या मध्ये भाग घेतला तसेच भारताच्या साहित्यामध्ये मोलाची भर पाडली. साने गुरुजी हे भारताला लाभलेले संवेदनशील स्वातंत्र्यसैनिक आणि एक चांगले साहित्यिक होते. साने गुरुजी (पांडुरंग सदाशिव साने) हे ११ जून १९५० रोजी मरण पावले.

महाराष्ट्र राज्यातील रायगड या जिल्ह्यामध्ये माणगाव तालुक्यात महामार्गापासुन आत मध्ये ३ ते ४ किमी अंतरावर वडघर हे गाव आहे आणि त्या ठिकाणी साने गुरुजींच्या स्मरणार्थ स्मारक उभारले आहे तसेच पुण्यामध्येदेखील साने गुरुजी यांच्या स्मरणार्थ स्मारक उभे केले आहे. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# युएसबी-सी पोर्टद्वारे आयफोन होऊ शकतो हॅक

गोपनीयता आणि सुरक्षिततेसाठी ओळखली जाणारी ॲपल कंपनी सध्या चर्चेत आहे. कारण एका संशोधकाने आयफोनच्या यूएसबी-सी कंट्रोलरची सुरक्षा यशस्वीरित्या भेदली आहे. त्यामुळे इथून पुढे आयफोन हॅक होण्याची शक्यता वाढली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून



पल हॅकर्सचे लक्ष्य आहे, परंतु आतापर्यंत हॅकर्सना आयफोनची सुरक्षा भेदता आली नव्हती. आता सुरक्षा संशोधकाने यूएसबी-सी कंट्रोलर हॅक केल्याचा दावा केल्यानंतर आयफोन वापरणाऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. दरम्यान या संपूर्ण प्रकरणावर ॲपल कंपनीकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

**थॉमस रोथ यांनी भेदली आयफोनची सुरक्षा**


दरम्यान, सुरक्षा संशोधक थॉमस रोथ यांनी या चिपमधील एक बग शोधून काढला आहे. रोथ यांना असे आढळून आले की, रिव्हर्स इंजिनिअरिंग, आरएफ साइड-चॅनेल नालायसिस आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक फॉल्ट इंजेक्शनचा वापर करून -उए३ चिपची सुरक्षा भेदली जाऊ शकते. यातून हॅकर्स सर्व सुरक्षा भेदून डिव्हाइसवर नियंत्रण मिळवू शकतात.

थॉमस रोथ हे कंट्रोलर पुन्हा प्रोग्राम करण्यात, कोड इंजेक्ट करण्यात आणि सर्व सुरक्षा भेदण्यात यशस्वी झाले असल्याचा दावा करण्यात आला आहे. याचा अर्थ असा की, जर हॅकर्स आयफोनमधील या त्रुटीचा फायदा घेण्यास यशस्वी झाले तर ते आयफोनमध्ये आणि संभाव्यतः डेटामध्ये प्रवेश मिळवू शकतात, जी अर्थातच चिंताजनक बाब आहे. असे असले तरी, जोपर्यंत हॅकर तुमच्या फोनला यूएसबी-सी केबल कनेक्ट करणार नाही तोपर्यंत त्याला फोन हॅक करता येणार नाही.

**आयफोन युजर्सनी काय काळजी घ्यावी?**

या त्रुटीमुळे होणाऱ्या सांभाव्य धोक्यापासून वाचण्यासाठी आयफोन युजर्सनी सार्वजनिक ठिकाणच्या सी-टाईप चार्जर्सचा वापर टाळावा. आपत्कालीन परिस्थितीत तुमचा स्मार्टफोन चार्ज करण्यासाठी नेहमी पॉवर बँक सोबत ठेवा. तसेच, कधीही अनोळखी डिव्हायसेसवर डेटा ट्रान्सफर करू नका. या गोष्टी पाळल्या तर आयफोन युजर्स यूएसबी-सी पोर्टद्वारे होणाऱ्या सायबर हल्लापासून वाचू शकतात.

# उद्योजक घनश्यामदास बिर्ला



## निमित्त

आपल्या देशामध्ये अनेक असे उद्योजक होऊन गेले, ज्यांनी देशाचं भविष्य घडवण्यासाठी कठोर मेहनत घेतली. घनश्यामदास बिर्ला हे त्यांच्यापैकीच एक नाव. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

घनश्यामदास बिर्ला यांचा जन्म १० एप्रिल १८९४ रोजी राजस्थानच्या पिलानी गावात एका मारवाडी कुटुंबात झाला. शून्यातून विश्व निर्माण करणार्या व्यक्तींमध्ये हे नाव प्रामुख्याने घेतले जावे अशा पद्धतीचे त्यांचे कार्य होते. त्यांनी भारतामध्ये अनेक प्रकारच्या शिक्षण संस्था तसेच धार्मिक संस्थांची स्थापना करून भारताला प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी मदत केली. ज्याने एकेकाळी गरिबीचे चटके सहन केलेले आहेत, ज्याला गरिबी काय असते याची पूर्णपणे जाणीव होती, पण यामुळे त्यांनी परिस्थितीला कधीच दोष दिला नाही. त्यांनी त्यांचा संघर्ष नेहमीच चालू ठेवला. त्यांना स्वतः वर विश्वास होता. त्यांना माहिती होते की आपण आयुष्यामध्ये काहीतरी मोठे नक्कीच करून दाखवू शकतो.

जेव्हा त्यांचा मृत्यू झाला त्यावेळी त्यांच्या बिर्ला ग्रुपच्या मालकीच्या दोनशे कंपन्या अस्तित्वात होत्या आणि या संपूर्ण कंपन्यांची एकूण संपत्ती दोन हजार कोटीच्या आसपास होती, पण हे सत्य खूप कमी जणांना माहिती असेल की घनश्यामदास बिर्ला त्यांच्या बंधूसोबत एका लहानशा खोलीमध्ये राहत असत. त्याच खोलीमध्ये स्वयंपाक करत असत आणि स्नानही त्याच खोलीमध्ये करत असत.

घनश्यामदास बिर्ला यांच्याबद्दल अजून एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, त्यांचे शिक्षण पाचवी पर्यंतच झालेले होते. ज्यावेळी त्यांचे मोठे बंधू त्यांना असे सांगत की आपलं नशीब आपल्या सोबत नाही, त्यावेळी घनश्यामजी त्यांच्या मोठ्या बंधूंना समजावून सांगत की नशीब आपल्या हातामध्ये असते आणि आपल्या कष्टाने आणि कर्मानेच आपण एक दिवस या जगाला काहीतरी नेत्रदीपक करून दाखवू.

या सर्व प्रवासात त्यांचा स्वतः वरील विश्वास हीच त्यांची सर्वांत मोठी ताकद होती. त्यांनी काही दिवसांनी त्यांच्याकडील काही पैशांची जमवाजमव करून स्वतःचा सुती व्यवसाय सुरू केला.

ज्यावेळी त्यांनी हा व्यवसाय चालू केला, त्यावेळी या पूर्ण व्यवसायावर फक्त इंग्रजांचा एकाधिकार होता, त्यामुळे इंग्रजांनी त्यांना या व्यवसायामध्ये अनेक अडचणी उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. या परिस्थितीतही घनश्यामजी खचले नाहीत, त्यांना आशा होती की याही परिस्थितीतून ते मार्गक्रमण करतील आणि इतिहास साक्षी आहे, की त्यांनी या सर्व संकटांवर मात करत एक विशाल कार्य भारताच्या प्रगतीसाठी करून दाखविले. त्यांनी अशा परिस्थितीतही त्यांचा व्यवसाय यशस्वीरीत्या केला. त्यांनी एक नव्हे तर दोनशे कंपन्यांची स्थापना केली. त्यांची प्रगती इंग्रज थांबवू शकले नाहीत. बिर्ला यांनी अनेक मंदिरांची स्थापना केली, अनेक ट्रस्ट स्थापन केले, जे लोकांना गरजेच्या वेळी मदत करतात.

घनश्यामजींनी स्थापन केलेली पिलानी येथील बिट्स संस्था आज भारतातील अग्रगण्य अभियांत्रिकी संस्थांपैकी एक मानली जाते. त्यांनी समाजाचे देणे म्हणून मुंबईमध्ये एक विशालकाय इस्पितळ बनवून घेतले. त्यांनी देशभरामध्ये अनेक ठिकाणी शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली. अशा या महान उद्योजकाचे ११ जून १९८३ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यात ॲलर्जीची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय

पावसाळा ऋतू आपल्यासोबत अनेक प्रकारच्या ॲलर्जी घेऊन येतो. ज्यांना आधीच कोणत्याही प्रकारच्या ॲलर्जीचा त्रास आहे त्यांच्यासाठी ही समस्या आणखी वाढते. या ऋतूमध्ये वाढत्या आर्द्रता आणि उष्णतेमुळे बुरशी आणि बॅक्टेरिया वाढतात, ज्यामुळे ॲलर्जी होऊ शकते.



यामध्ये दमा,ॲलर्जीक राहिनाइटिस, एटोपिक डर्माटायटीस, अन्न ॲलर्जी आणि औषध ॲलर्जी यांचा समावेश आहे.

तथापि, जर आपण ॲलर्जीची कारणे आणि लक्षणे समजून घेतली आणि काही खबरदारी घेतली तर आपण कोणत्याही अडचणीशिवाय पावसाळ्याचा आनंद घेऊ शकतो.

पावसाळ्यात आर्द्रता खूप वाढते. ही आर्द्रता बॅक्टेरिया आणि बुरशीसाठी अनुकूल वातावरण तयार करते. हवेत त्यांचे प्रमाण वाढल्याने श्वसन, त्वचा आणि डोळ्यांच्या ॲलर्जीचे प्रमाण वाढते. यामुळे, दम्याने ग्रस्त असलेल्या लोकांना श्वास घेण्यास अधिक त्रास होऊ शकतो.

हवेतील वाढलेली आर्द्रता, बंद जागांमध्ये असलेली घाण आणि बॅक्टेरिया, बुरशी आणि कीटक यामुळे ॲलर्जीचा धोका वाढतो. घरातील आणि आजूबाजूच्या परिसरात असलेली घाण आणि ओलावा ॲलर्जी निर्माण करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देते, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास, त्वचेवर पुरळ आणि संसर्ग यासारखी लक्षणे उद्भवू शकतात. याशिवाय, काही खास गोष्टी ऍलर्जीचा धोका वाढवतात, ज्या जाणून घेणे आणि टाळणे महत्वाचे आहे. जसे की-

ओले कपडे, ओल्या भिंती आणि जुन्या फर्निचरमुळे बुरशी वाढू शकते, जी श्वसनाच्या ऍलर्जीचे एक प्रमुख कारण बनते.

धुळीच्या आणि ओल्या ठिकाणी असलेल्या बॅक्टेरियामुळे दमा, सायनस आणि त्वचेच्या ॲलर्जी होऊ शकतात.

ओले बूट, मोजे आणि चप्पल वापरल्याने पाय आणि नखांमध्ये बुरशीजन्य संसर्गाचा धोका अनेक पटींनी वाढतो.

दूषित किंवा उघड्या अन्नामुळे पोटातील ॲलर्जी, अतिसार आणि अन्नातून विषबाधा होऊ शकते.डास किंवा कीटक चावल्याने त्वचेची ॲलर्जी, सूज आणि खाज सुटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.


या ऋतूत, थोडीसा निष्काळजीपणा देखील ॲलर्जी निर्माण करू शकते. विशेषतः जेव्हा कपडे ओले राहतात, घरात ओलसरपणा असतो किंवा त्वचा योग्यरित्या स्वच्छ केली जात नाही. तथापि, जर काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली तर हे बऱ्याच प्रमाणात टाळता येते.

## खोपोलीत नैसर्गिक नाल्यांतील भराव व अतिक्रमणे

# पूरस्थितीला देतात आमंत्रण

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील तिन्ही मुख्य नाल्यांत झालेले अतिक्रमण व करण्यात आलेला अतिरिक्त मातीभराव नालेसफाई मोहिमेत सर्वात मोठी समस्या बनली असून पावसाळ्यात शहरात पूरस्थितीला मुख्य कारण असल्याचे स्पष्ट असूनही या बाबत नगरपालिके कडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने नालेसफाई होऊनही पावसाळी संभाव्य पूरस्थिती मात्र कायम राहणार असल्याने सांगितले जात आहे.



दरवर्षाप्रमाणे याही वर्षी खोपोली नगरपालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे करण्यात आली आहेत . प्रभागनिहाय सर्व कामे जून १० पर्यंत पूर्ण होतील असे नगरपालिका कडून सांगण्यात येत आहे. यासाठी कंत्राटी कामगारांची विशेष टीम नियुक्त करण्यात आली असून , दोन सुपरवायझर, एक आरोग्य निरिक्षक व गरजेनुसार जेसीबी, मलनिःसारण गाडी याकामी वापरण्यात येत आहे खोपोली नगरपालिका प्रशासनाकडून पावसाळ्यापूर्वी कोणतीही गटार व नाला सफाईपासून राहणार नाही असे नियोजन करण्यात आले आहे .

सुरुवातील रहिवाशी भागातील भूमिगत व उघड्या गटारे ,नंतर नैसर्गिक नाले अश्या पद्धतीने ही नालेसफाई १० जून पूर्वी पूर्ण होणार असल्याचे नियोजन करण्यात आले आहे. शहरात मोगालावाडी ते हायको कॉर्नर या भागातील सर्व रहिवाशी भागांना जोडणारा मोठा नैसर्गिक नाला आहे . पावसाळ्यात सह्याद्री डोंगर रांगातून वाहणारे पाणी याच नाल्याच्या मार्गाने पुढे पाताळगंगा नदीला जाते. मात्र मागील काही वर्षांत नाल्याला लागून असलेल्या वस्त्या व रहिवाशांनी तसेच विकसकांनी अतिरिक्त माती भराव व अतिक्रमणे करून या नाल्याची नैसर्गिक रुंदी चाळीस ते पन्नास टक्के कमी केली आहे.

अशीच स्थिती अन्य दोन्ही मुख्य नैसर्गिक नाल्यांची आहे. मुसळधार पाऊस सुरु झाल्यावर पाण्याचा निचरा होत नसल्याने विणानगर, कृष्णा नगर, शास्त्रीनगर मधील काही भाग, तसेच खालची खोपोली, शीळफाटा येथील मोठया वस्तीत पाणी भरून दरवर्षी पूरसदृश्य स्थिती निर्माण होते. नाल्यातील सदर झालेले अतिक्रमणे व अतिरिक्त माती भराव नगरपालिकेने काढण्याची गरज आहे .

> **शहरातील सर्व गटारी व नाले साफसफाईची कामे नियोजनानुसार पूर्ण करण्यात आली आहेत. यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. कोणाताही रहिवाशी भाग या मोहिमेतून सुटणार नाही याची खात्री करण्यात येणार आहे. काही कामे शिल्लक असल्यास येत्या आठवड्यात अशी कामे पूर्णत्वास येतील.**
> **–डॉ पंकज पाटील,** मुख्याधिकारी खोपोली नगर परिषद

# ओव्हरटेक करताना अपघात

## कळंब-मुरबाड मार्गावर महिला गंभीर

**नेरळ : प्रतिनिधी**

ओव्हरटेकच्या नादात डॉक्टरने दाम्पत्याला उडवल्याची घटना कळंब मुरबाड या राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली.रुग्णालयाच्या समोरच घडलेल्या या दुर्घटनेत महिला गंभीर जखमी असून पतीला देखील जबर मार लागला आहे.



रोशनी वाघ आणि भरत वाघ असे जखमी दांपत्याचे नाव असून कार अपघात करणारा डॉ. शुभम बाळासाहेब पवार यांनी स्वतः जखमींना रुग्णालयात दाखल केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील म्हसा या शासकीय रुग्णालयात डॉक्टर या पदावर असलेले शुभम बाळासाहेब पवार हे कर्जतला येण्यासाठी निघाले होते.कर्जत मुरबाड या राष्ट्रीय महामार्गावरील कळंब या प्राथमिक आरोग्य केंद्रजवळ आपल्यासमोरील बसला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करतांना समोरून पायी चालणारे रोशनी वाघ आणि भरत वाघ या दांपत्याला उडवले आणि थेट वाहन रस्त्याच्या कडेला असणाऱ्या शेतात घुसले. २०० मीटर लांब या दाम्पत्यांना डॉक्टरांनी आपल्या वाहनाने खेचत नेल्याने यामध्ये महिला रोशनी हिच्या पायाचे आणि हाताचे हाड मोडल्याचे सांगण्यात आले आहे. पती भरत यांच्याही कंबरेला जबर दुखापत होऊन या दुर्घटनेत पती पत्नी दैवबलवत्तर म्हणून थोडक्यात बचावले आहेत.

जखमींना कळंब या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले होते, मात्र अधिक उपचारासाठी जखमी दाम्पत्यांना अपघात ग्रस्त कारचालक डॉक्टर शुभम पवार यांनी रुग्णवाहिकेतून कर्जत भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेले आहे.

रात्र पाळी करून निघालेले डॉक्टरांना ओव्हरटेक करीत असताना जागरणामुळे डोळ्यांवर झापडआल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## तळा तालुक्यात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**तळा : प्रतिनिधी**

पतीच्या दिर्घ आयुष्यासाठी,तसेच अखंड सौभाग्यासाठी विवाहीत महिला वटपोर्णिमा साजरी करतात.तालुक्यात महिलांनी विधीवत वटपौर्णिमेचा व्रत करुन वडाचे पुजन केले. महिलांच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळत होते.

९ जूनपासूनच महिला वटपौर्णिमेच्या तयारीला लागून वाण खरेदी करणे,फळे खरेदी करणे,पाने शोधून ती आणून ठेवणे.विविध प्रकारची फुले साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी झाली होती, तर १० जून रोजी प्रत्यक्ष वटपौर्णिमेच्या दिवशी पतीच्या दिर्घ आयुष्यासाठी तसेच अखंड सौभाग्यासाठी विवाहीत महिलांनी तालुक्यातील गावागावांतून वटपौर्णिमेचा व्रत करून वडाचे पूजन केले आहे.



## रोह्यातील तरुण ठरला कोकणातील पहिला एअरक्राफ्ट इंजिनियर

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा अल्पसंख्यांक विकास मंच आणि रोहा एज्यू. अँड वेल्फ. असोसिएशन या संस्थेचे उपाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते सलीम चोगले यांचे चिरंजीव दानियाल चोगले याने अवघ्या २७ वर्षात एव्हीएशन क्षेत्रात महत्वपूर्ण यश मिळविले असून ए ३२० ` ते एटीआर या दोन्ही विमानांवर अधिकृत स्वाक्षरीचे अधिकार मिळवणारे कोकणातील पहिले एअरक्राफ्ट इंजिनियर ठरले आहेत.तरुण वयात वैमानिक क्षेत्रात उतुंग भरारी घेतल्याबद्दल दानियाल चोगले यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



दानियाल चोगले यांने नर्सरी पासून इयत्ता १२ वी पर्यंत रोह्यातील जे.एम. राठी स्कुल आणि ज्युनियर कॉलेज या शाळेत शिक्षण पूर्ण केले.बालपणापासून वैमानिक क्षेत्राची आवड असणाऱ्या दानियाल याने पुढील शिक्षणासाठी शिक्षणासाठी पुणे गाठले. त्या ठिकाणी हिंदुस्थान एरोस्पेस अँड इंजिनिअरिंग कॉलेज मधून एअरक्राफ्ट इंजिनियरिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांचा व्यवसायिक प्रवास विस्तारा एअरलाईन्स या कंपनीतून सुरु झाला.या ठिकाणी साडे तीन वर्ष सेवा दिल्यानंतर अनुभवाच्या जोरावर त्यांनी नावाजलेल्या इंडिगो एअरलाईन्स या कंपनीच्या सेवेत रुजू झाले.

या ठिकाणी नोकरी करित असताना त्यांनी ॲडवान्सड एअरबस ए ३२० आणि एटीआर ७२ विमाननांवर तांत्रिक जबाबदारी संभाळत आहेत.कु. दानियाल चोगले याने वैमानिक क्षेत्रात घेतलेली गरुड झेप तरुणांसाठी एक प्रेरणा असून मोठी स्वप्न उराशी बाळगून व ते स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली तर यश नक्कीच मिळते हे त्याने सिद्ध करुन दाखवले आहे. दानियालच्या यशस्वी कामगिरीने रोह्याचे नाव देशपातळीवर पोहचले आहे. या बद्दल त्याचे सर्व समाजातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे..

कोट : मी रोह्यासारख्या छोट्याशा गावात जन्म घेतले असून जिथे विमान फक्त आकाशातून दिसते. माझे वडील सलीम,आई तबस्सूम,बहीण मेहवीश यांनी केलेले सहकार्य आणि रोहेकर जनतेच्या आशिर्वादामुळे मी आता पर्यंत मजल मारली आहे.

# मोरे महिला महाविद्यालयाचे किल्ले रायगडावर स्वच्छता अभियान

**रोहे : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणास्थान असणाऱ्या किल्ले रायगड येथे मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) विभागामार्फत शनिवारी एक दिवशीय स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शिवराज्याभिषेक सोहळ्याचे (दि ६ जून) औचित्य साधून राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात संपूर्ण रायगड जिल्ह्यातील २५ महाविद्यालय तील ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एम.बी फाउंडेशन संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव येथील २३ विद्यार्थिनी आणि २ शिक्षक यात सहभागी होते.



ऐतिहासिक वारसा असलेल्या गड व किल्ल्यांबाबत विद्यार्थ्यांना जिव्हाळा निर्माण व्हावा आपले गड व किल्ले निरंतर स्वच्छ राहावेत आणि त्यामार्फत आजच्या तरुणाईला या महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास कळावा या उद्देशाने मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग दरवर्षी ही स्वच्छता मोहीम राबवत असते. या अभियानांतर्गत विद्यार्थिनीनी किल्ले रायगड येथे राजसदन परिसरातील स्वच्छता केली. जमा झालेल्या कचऱ्याची मानवी साखळीच्या साह्याने डम्पिंग ग्राउंडवर त्याची विल्हेवाट लावण्यात आली. दुपार सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू अजय भामरे, राष्ट्रीय सेवा योजने (एनएनएस) विभागाचे मुंबई विद्यापीठ संचालक सुशील शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ सुनील पाटील, एनएनएस रायगड विभाग समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## रेल्वे अपघातातील मृतांना कर्जत येथे श्रद्धांजली

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई पुणे मार्गावर मुंब्रा रेल्वे स्थानकात दोन गाड्या समोरासमोरून निघून जात असताना काही प्रवाशांना आपले जीव गमवावे लागले आहे.त्या घटनेबद्दल कर्जत रेल्वे स्थानकात श्रद्धांजली वाहण्यात आली.

मुंब्रा येथे झालेल्या रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांना कर्जत रेल्वे स्थानकात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ही श्रद्धांजली कर्जत रेल्वे आरपीएफ, जिआरपी आणि कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.

## वटपौर्णिमा उत्साहात, सुहासिनींच्या वटवृक्षाला फेऱ्या

**कर्जत : प्रतिनिधी**

यंदा वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. आज सुट्टी नसल्याने चाकरमानी सकाळच्या सुमारास वटवृक्षाची पूजा करण्यासाठी बाहेर पडल्या. अगदी काल – परवा पर्यंत विवाह पार पडत होते. त्यामुळे वटपौर्णिमेसाठी नव वधुंची संख्या मोठी होती.

पारंपरिक वेशभूषा करून सुहासिनी वटवृक्षाला फेऱ्या मारण्यासाठी तयार होत्या. अनेक जूने वटवक्ष तोडण्यात आल्याने सुहासिनींना वटवृक्षाची पूजा करण्यासाठी पायपीट करावी लागली. तर काही महिलांनी वटवृक्षाच्या फांद्या घरी आणून पूजा केली.


हल्लीच्या मोबाईलच्या जमान्यात काही सुहासिनींना सेल्फीचा मोह आवरता आला नाही. 'सात जन्मी हाच नवरा मिळू दे' अशी प्रार्थना केली



# नागावचे जागृत दक्षिणमुखी देवी मंदिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आंग्रेकालीन अष्टागरातील एक महत्वाचे गाव म्हणजे नागाव, आजच्या आधुनिक जगात पर्यटनासाठी प्रसिध्द ठिकाण याच नागावमध्ये असलेल्या काही निवडक पुरातन मंदिरापैकी एक म्हणजे दक्षिणमुखी देवी चे मंदिर नागावच्या मुख्य रस्तालगत हे मंदिर आहे.



आजपासून ५ ते ६ पिढयापुर्वी म्हणजेच साधारतः २०० ते २५० वर्षे पुर्वी येथे राहणारे चिटणीस कुटूंबिय यांना ही मुर्ती शेतामध्ये नांगरणी करताना सापडली. याच नागंराची खुण सुध्दा देवीच्या पायावर दिसून येते. चिटणीस कुटूंबियांनी मग या देवीची स्थापना याच जागेवर पुर्वाभिमूख केली, पण देवीचे रूप दक्षिणाभिमुख बदलल्याचे दिसून आले, असे २ ते ३ वेळा घडले. त्यानंतर स्थानिक पंडिताच्या सल्लानुसार या देवीची स्थापना दक्षिणामुख केली. व त्याचबरोबर शेजारी श्री महालक्ष्मी देवीची पुर्वाभिमूख स्थापना केली. यांच चिटणीस कुटूंबियाचे सभासद श्री अभय चिटणीस व श्री अजीत चिटणीस हे सध्या येथील देखभाल करतात, ही देवी येीिल चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाजाची कुलदैवत आहे. या मंदिराला अहिल्यादेवी होळकर यांच्याकडून दिवाबत्तीची लागणारी आर्थिक मदत येत असे.

श्री दक्षिणामुखी देवीच्या मंदिरामध्ये देवीची विविध रूपे पाहावयास मिळतात. सर्वात उजवीकडे श्री गणपती व श्री शंकर पार्वतीच्या मुर्ती आहेत. नंतर श्री महालक्ष्मीचे देवस्थान आहे. त्याच्या बाजूला श्री एकवीरा, श्री जोगेश्वरी,श्री आंबा,श्री निंबा,अशा प्रकारच्या देवीची रूपे पाहावयास मिळतात. नंतर दक्षिणेला मुख्य असलेली श्री महाकाली म्हणजेच दक्षिणामुखी श्री महाकाली देवीचे दर्शन होते. या देवीच्या बाजूला तिचे अंगरक्षक श्री क्षेत्रपाल यांची सुध्दा लहान मुर्ती पाहावयास मिळते. श्री महालक्ष्मी ही महिषासुरमर्दिनी च्या रूपामध्ये आहे. तर श्री दक्षिणामुखी देवी कालिकेच्या रूपामध्ये आहे. अलिकडेच मंदिराचे नुतनीकरण केले आहे. मंदिरामध्ये प्रवेश केला की, सुंदर लाकडी नक्षीकाम केलेला सभामंडप दिसतो. व मधोमध देवीच्या मुर्तीचे स्थान, मंदिरामध्ये दोन पुरातन अशा मोठया आकाराच्या पितळेच्या समया ठेवल्या आहेत. नवरात्री व इतर सण उत्सवाच्या वेळी हया समया देवी समोर प्रत्यालीत करण्यात येतात. या समयांवर पुरातन लिपीमध्ये काही लिहलेले दिसते. मंदिरामध्ये एक जुना व मध्यम आकाराचा नगारा सुध्दा आहे. देवीचे मुखवटे सुध्दा फार पुरातन असूनते श.के. १७९१ सालचे असल्याचे दिसून येते.

या मंदिरात शारदीय नवरात्रीला श्री दक्षिणामुख देवीच्या मंदिरामध्ये मोठा उत्सव साजरा केला जातो. देवीच्या सर्व रूपांना दागदागिन्यांनी मढविले जाते व फुलांची फार आकर्षक सजावट म्हणजेच फुलाची वाडी केली जाते. ही सजावट नवरात्रीच्या ९ रात्री अधिक एकादशीपर्यंत असे १२ ते १३ दिवस सुंदर आरास नित्यनेमाने रोज केली जाते. यांचे सर्व नियोजन विकास पिंपळे हे सांभाळतात,व यामध्ये बाबल्या काका मोहिते, वसंत करमरकर व गुरव कुंटूंबिय यांची सुध्दा मोलाची साथ असते. मंदिरामध्ये घटस्थापना सुध्दा केली जाते.

## खोपोलीमधील आगीत होरपळलेल्या सुहास तळेकरांचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील काजूवाडी येथील समाजमंदिराच्या जवळ असणाऱ्या घराला लागलेल्या आगीत घरात असणारे सुहास तळेकर हे भाजल्याने त्यांना नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने नवी मुंबई येथील बर्न रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्याची प्राणज्योत आज मावळली.

सुहास तळेकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त होत आहे. अनेकांनी संवेदना व्यक्त केल्या.



# नवी मुंबईतील नागरी सेवांबाबत दक्षता

## पावसाळ्यातील दक्षतेसह स्वच्छता, आरोग्यविषयक बाबींचा आयुक्तांकडून आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

अंतिम टप्प्यातील पावसाळी कामे युध्द पातळीवर पूर्ण करावीत तसेच रस्त्यांवर विविध कामांसाठी केलेले खड्डे बुजविल्यानंतर त्याचे पुनर्पृष्ठीकरण झाले असल्याची सर्व ठिकाणी खातरजमा करुन घ्यावी. स्ट्रॉम वॉटर ड्रेनच्या वॉटर एन्ट्री चोकअप होणार नाहीत याकडे नियमितपणे काटेकोरपणे लक्ष द्यावे असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले. भरतीची वेळ आणि अतिवृष्टी जुळून आल्यास ज्याठिकाणी पाणी साचू शकते अशा सखल भागाकडे अधिक बारकाईने लक्ष द्यावे व त्याठिकाणी जास्तीचे पाणी उपसा पंप व्यवस्था करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले. होल्डींग पाँड आणि पंपींग हाऊसच्या ठिकाणीही अतिरिक्त पंप व्यवस्था तसेच जनरेटर व्यवस्था करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.



वृक्ष छाटणी केल्यानंतर पडणारा हरित कचरा लगेच उचलण्याबाबत यंत्रणा तत्पर ठेवावी तसेच सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेवर अधिक बारकाईने लक्ष द्यावे असेही निर्देश आयुक्तांनी दिले. नवी मुंबई महानगरपालिकेने दोन्ही परिमंडळासाठी स्थापन केलेले स्वतंत्र आपत्कालीन प्रतिसाद दल मदत कार्यासाठी सज्ज राहण्याच्या दृष्टीने प्रमाण मानक कार्यप्रणाली तयार करावी व त्यांना कृतीशील करावे अशाही सूचना आयुक्तांनी दिल्या. अग्निशमन यंत्रणा कार्यतत्पर ठेवावी आणि उपलब्ध साहित्य, उपकरणे यांची चाचणी करून घ्यावी असे सूचित करतानाच महानगरपालिका क्षेत्रातील सिडको, रेल्वे, एमआयडीसी, पीड्ब्ल्यूडी, एमएसईडीसीएल अशा विविध प्राधिकरणांशी परस्पर समन्वय ठेवून नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले.

### दक्षतेबाबत सूचना

नागरिकांना सुलभ सेवा उपलब्ध करुन देणे हे आपले कर्तव्य असून त्यासाठी सर्वांनी तत्पर रहावे व त्यासोबतच महानगरपालिकेच्या मालमत्तांचा गैरवापर केला जाणार नाही याबाबतही दक्ष रहावे अशा सूचना नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केल्या.

पाऊस पडत असताना सध्या दोन-तीन दिवसांचा खंड पडतो आहे. त्यामुळे असे ऊन व पावसाच्या कालावधीचे वातावरण डासांच्या उत्पत्तीला पोषक असून त्या अनुषंगाने डास प्रतिबंधात्मक कार्यवाहीवर अधिक भर द्यावा. लोकवस्तीच्या भागात धुरीकरणाचे प्रमाण वाढवावे तसेच नागरिकांच्या दुलर्क्षामुळे एखाद्या घरात डास आळ्या निर्मिती झालेली आढळल्यास सामाजिक आरोग्याला विघातक बाबीबद्दल दंडात्मक कार्यवाही करण्याची खातरजमा करून घ्यावी, अशाही सूचना आयुक्तांनी केल्या.

मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील १५० दिवसांचा कार्यक्रम यामध्ये ई गव्हर्नन्स कृती आराखडा करुन त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तत्पर कार्यवाही करावी व यामध्ये सर्वच विभागप्रमुखांनी लक्ष द्यावे अशा सूचना देत ऑनलाईन सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात असेही आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आले. या अंतर्गत व्हॉट्सअॅप आधारीत सेवा पुर्ततेकडे लक्ष देऊन एआय बेस्ड चॅटबोट, ब्लॉक चेन, डिजी लॉकर अशा अत्याधुनिक तंत्रप्रणालींचा कार्यालयीन वापर करण्याच्या दृष्टीने जलद कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या ६८ लोकसेवा शासनाच्या आपले सरकार पोर्टलशी संलग्न असून या व्यतिरिक्त नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या इतर ३७ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची सुरू असलेली कार्यवाही गतीने पूर्ण करुन घ्यावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

विभागामध्ये सुरू असलेल्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने डॅश बोर्ड हा उत्तम पर्याय असून त्यादृष्टीने मालमत्ता कर व घनकचरा व्यवस्थापन विभागांप्रमाणेच इतरही विभागांनी डॅश बोर्ड तयार करून स्वत:ला अद्ययावत करावे, अशा सूचना करण्यात आल्या.

१६ जून पासून शाळा सुरु होत असून महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये शाळा प्रवेश दिन साजरा करण्यात यावा असे निर्देशित करतांनाच विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्षात उत्साहाने स्वागत करावे तसेच त्यांना त्याच दिवशी युनिफॉर्म, पुस्तके उपलब्ध होतील याचे नियोजन करुन काटेकोर अंमलबजावणी करावीत असे निर्देश आयुक्तांनी दिले.

पावसाळी कालावधीच्या दृष्टीने धोकादायक इमारतींची यादी नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी विविध माध्यमांतून प्रसिध्दी देण्यात यावी तसेच सी-१ कॅटेगरीतील अतिधोकादायक इमारती रिकाम्या करण्याची कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले. अतिक्रमण विभागाचे पोर्टल असावे व त्यामध्ये माहिती अदययावत ठेवण्यात यावी अशाही सूचना आयुक्तांमार्फत देण्यात आल्या.

नवी मुंबईमध्ये बेघरांमुळे शहर स्वच्छतेला व नियोजनाला बाधा पोहचत असून त्यावर नियंत्रण आणण्यासाठी पोलीस विभागासमवेत विभागीय पातळीवरुन तत्पर कार्यवाही करावी तसेच यादृष्टीने उड्डाणपुलाखालील जागेला पत्र्याचे कुंपण करुन घ्यावे असेही निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे शेल्टर होमच्या संख्येत वाढ करावी अशाही सूचना देण्यात आल्या.

रस्त्याच्या कडेला वाहने पार्किंगमुळे मोठया प्रमाणात वाहतुकीच्या समस्या होत असल्याचे लक्षात घेऊन पोलीस विभागाच्या सहयोगाने नो पार्किंग झोनचे फलक लावावेत व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याकडे लक्ष दयावे अशा सूचना देतानाच प्राधान्याने से-१५ सीबीडी बेलापूर परिसरात नवी मुंबई महानगरपालिकेने बहुमजली वाहनतळ बांधला असून तो उपयोगात आणण्याच्या दृष्टीने तसेच या विभागातील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने या बाबीच्या अंमलबजावणीकडे गांभिर्याने लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.

# मनपाच्या व्यायामशाळेत मद्यपींची पार्टी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबईतील सानपाडा येथील मनपाच्या व्यायामशाळेत रंगली वाढदिवसाची ओली पार्टी साजरी केल्याचे आढळून आले. याबाबतचे स्टिंग ऑपरेशन एका सतर्क नागरिकाने केले. सानपाडा सेक्टर ५ मधील मनपाच्या मालकीच्या व्यायामशाळेतील धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या घटनेची पालिकेने गांभीर्याने दखल घेत ही व्यायामशाळा सील करत त्यास कुलूप ठोकले.



## बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा नोंद

महापालिकेच्या ताब्यात असलेल्या सानपाडा येथील व्यायाम शाळेत बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तुर्भे विभाग कार्यालयाचे अधिक्षक हेमचंद्र पाटील यांनी सानपाडा पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदवली होती.

व्यायामशाळेच्या जिन्यावर मटण शिजवून, चक्क 'ओली' पार्टी केल्याचे आढळून आले. ४० जणांची दारू पार्टी रंगली होती. हा खळबळजनक प्रकार मोबाईल विडिओमध्ये कैद झाला. पालिकेच्या वास्तूत ही पार्टी कोणी केली असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. त्यावेळी मनपाचे सुरक्षा रक्षक नव्हते का? व्यायामशालेत ओली पार्टी करण्याची परवानगी दिली कोणी? या संतापजनक प्रकाराला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न यामाध्यमातून राहिले उभे राहिले आहेत.

पाटील यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, गावदेवी मैदान, सेक्टर ५, सानपाडा येथे महापालिकेची व्यायामशाळा आहे. व्यायामशाळा ही भाडेतत्वावरती देण्यात आली होती. सध्या तिचा भाडेकरार संपलेला असून ती महापालिकेच्या ताब्यात आहे. या व्यायामशाळा मध्ये ८ जून या दिवशी काही अज्ञात व्यक्तींनी बेकायदेशीरपणे प्रवेश करून आत मध्ये मद्यपान केले आहे. याप्रकरणीचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर प्रसारित झाला आहे. त्यामुळे या व्यक्तीने विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात यावा, अशी मागणी पाटील यांनी अर्जात केली होती. याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध महापालिकेच्या ताब्यातील व्यायाम शाळेत बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



**उरण : भाजप शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील यांचा वाढदिवस आमदार महेश बालदी संपर्क कार्यालयात झाला. या वेळी भाजप नेते रवी भोईर, माजी नगरसेवक कौशिक शहा, राजेश ठाकूर, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, अभय घरत, समीर कुथे, निखील माळी आदी उपस्थित होते.**

# द्रोणागिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उरण येथे शुक्रवारी (दि.६) छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन अत्यंत प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात इतिहासाचे स्मरण करताना, सामाजिक बदल, पर्यावरण संरक्षण आणि युवकांचे सक्षमीकरण यावर भर देण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे प्राचार्य मा. वे. पिल्ले यांनी भूषवले. त्यांनी आपल्या भाषणात शिवराज्याभिषेक दिनाचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

व्याख्याते समीर गायकर यांनी 'पंच परिवर्तन' या विषयावर सखोल आणि प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी समाज, प्रशासन, शिक्षण, पर्यावरण व आर्थिक क्षेत्रात बदल घडवण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेण्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर पुष्कर सहस्रबुद्धे यांनी सामाजिक समरचना व पर्यावरण संरक्षण या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे माजी गट निदेशक अविनाश वडके यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या बहुआयामी विकासासाठी आयोजित या स्पर्धांमध्ये निबंध, वकृत्व, चित्रकला आणि रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या सर्व स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळादेखील शिवराज्याभिषेक दिनाच्या दिवशीच उत्साहात झाला.

# पोलिसांनी ३५ बांगलादेशीयांना घेतले ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या ३५ बांगलादेशीयांन पनवेल शहर पोलीस ठाण्यासह पनवेल तालुका पोलिसांच्या विशेष पथकाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत ताब्यात घेतले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशानुसार मोठ्या प्रमाणात बांगलादेशीयांना शोधण्याचे काम परिमंडळ १ व परिमंडळ २ येथे सुरू असून त्या अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने शहरातील तक्का परिसरात कारवाई करत १२ जणांना ताब्यात घेतले आहे. त्याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने अशाच प्रकारे कारवाईत पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वावंजे परिसरात करून तेथून २३ बांगलादेशीयांना ताब्यात घेऊन पुढील शासकीय कारवाई करण्यात आली आहे.

# मैदान बचावसाठी आज आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे-जुईनगर मैदान बचाव समितीच्या वतीने बुधवार ११ जून रोजी सकाळी दहा वाजता आपले शिरवणे- जुईनगर ग्रामस्थ्यांचे हक्काचे मैदान बचाव करिता नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयावर जन आंदोलन करणार आहेत.

मैदानाच्या बाबतीत घेतलेल्या अन्यायकारक निर्णया विरोधात लोकशाही पद्धतीचा मार्ग अवलंबित आंदोलना द्वारे आपल्या हक्काचे मैदान पुन्हा शिरवणे जुईनगर ग्रामस्थांना मिळवून देण्यासाठी आंदोलन करणार असल्याचे डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी सांगितले. त्या अनुषंगाने शिरवणे येथील हनुमान मंदिरात घेतलेल्या ग्रामस्थांच्या पूर्व बैठकीत जन आंदोलन करणार असल्याचे घोषित करण्यात आले.

आपल्या हक्काच्या मैदान संवर्धना साठी भावी खेळाडूच्या भवितव्यासाठी, पुढील पिढीच्या निरोगी उज्वल भविष्यासाठी, मैदानाचे रक्षण करण्यासाठी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे माधुरी सुतार यांनी कळविले आहे.

# वाशीत युवा सेनेची बैठक



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के आणि शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या आदेशानुसार वाशी येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे जिल्हा प्रमुख किशोर पाटकर आणि युवा जिल्हा प्रमुख अनिकेत म्हात्रे यांच्या नेतृत्वात युवा सेनेची बैठक रविवारी सकाळी आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत युवा सेनेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. बैठकीत नवी मुंबईत युवा सेनेची बांधणी करणे, नवीन पदाधिकारी नेमणूक करणे, युवा सेना आपल्या दारी या मोहिमे अंतर्गत नागरिकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या समस्याची सोडवणूक करण्यासाठी शासनाशी पाठपुरावा करण्यासंदर्भात उपस्थिताना मार्गदर्शन आणि सूचना करण्यात आल्या.

आगामी नवी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूका तोंडावर असल्याने युवा सेनेचे त्यात अधिक महत्त्व असून तरुण युवा सैनिकांनी निवडणुकीच्या दृष्टीने कामाला सुरवात करण्याचे आवाहन जिल्हा प्रमुख किशोर पाटकर यांनी केले.



# महाराष्ट्र लोकाधिकार समितीची बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकाधिकार समिती या राज्यव्यापी संघटनेची बैठक भारतीय विद्या भवन कॉन्फरन्स हॉल, वाशी येथे समिती अध्यक्ष अॅड. प्रसाद करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश समन्वयक अनिल जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या वेळी मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शनपर बोलताना प्रदेश समन्व्यक अनिल जाधव यांनी सांगितले की, आजचे कायदे कालबाह्य असून हे माणसाला आर्थिक पारतंत्र्यात टाकणारे आहेत. वसुलीकारांनी ग्राहकाला समजून घ्यायला हवे. त्यांना मानसिक आधार दिला पाहिजे तर बेकायदेशीर कर्ज वसुली करणारे एजंट, क्रेडिट कार्डच्या वसुलीसाठी बेकायदेशीरपणे सावकारी पद्धतीची वसुली करणाऱ्या एजन्सी, बेकायदेशीरपणे कर्जदारांसह त्यांच्या कुटुंबीयांना बेघर करणाऱ्या वित्तीय संस्थांच्या कारवाईला रोखणे, अर्थनिर्भर युवा वर्ग निर्माण व्हावा, यासाठी उद्योग-व्यवसायांच्या मार्गातील सर्व अडचणी दूर करण्यासाठी युवा वर्गासोबत खांद्याला खांदा लावून उभे राहणे आदी प्रमुख उदिष्ट समितीचे असल्याचे अध्यक्ष अॅड प्रसाद करंदीकर यांनी सांगितले.

# गांजा विक्रीसाठी आलेला तरुण अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मधील आसुडगावाजवळ गांजा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला खांदेश्वर पोलिसांनी अटक केली आहे. रोहीत जमुना यादव (वय २०) असे या तरुणाचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळ असलेला ६७९ ग्रॅम वजनाचा १३,५८० रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे. हा गांजा त्याने कुठून आणला याचा पोलिसांकडुन तपास करण्यात येत आहे.

या कारवाईत अटक करण्यात आलेला आरोपी रोहीत यादव हा आसुडगावात राहण्यास असून तो आसुडगाव येथील देशी तडका हॉटेलजवळ 'गांजा' विक्रीसाठी घेऊन आला होता. या वेळी खांदेश्वर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक (गुन्हे) सचिन परदेशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद बरकडे व त्यांचे पथक आसुडगाव येथे पेट्रोलिंग करत आले होते. या वेळी आरोपीच्या बॅगेची तपासणी केली असता, त्याच्या बॅगेमध्ये ६७९ ग्रॅम वजनाचा १३,५८० रुपये किंमतीचा गांजा हा अमली पदार्थ आढळुन आला. त्यानंतर रोहीत यादव याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# सानपाड्यात जुने कपडे संकलन पेटी



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबई क्षेत्रातील निराश्रीत व गोरगरीबांना वापरायोग्य कपडे लोकसंकलातून उपलब्ध व्हावेत या हेतुने नवी मुंबई महानगरपालिका व अन्य सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेल्या जुने वापरायोग्य कपडे संकलन पेटीचे लोकार्पण नुकतेच सानपाडा -सोनखार (पामबीच) सेक्टर १३ येथील तीर्थरूप शारदामाई धर्माधिकारी उद्यानात माजी नगरसेविका वैजयंती दशरथ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

विभागातील महिला -पुरुष नागरिक व विभाग अधिकारी सागर मोरे आणि महापालिका कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा सेवाभावी उपक्रम आपल्या सोनखार परिसरात सुरु करण्यात आला आहे.

सोनखार -पामबीच मधील रहिवासी नागरिकांनी आपल्या घरातील वापरात नसलेले चांगल्या स्थितीतील सर्व वयोगटातील लहान मुलांपासून ते मोठ्या महिला - पुरुषांचे कपडे या संकलन पेटीत दान करावेत जेणेकरून शहरातील गरजूनां त्याच लाभ मिळेल असे आवाहन देखील वैजयंती भगत यांनी केले आहे.

# माथेरानच्या पर्यटनाला गती हवी!

## समस्या मार्गी लागण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक





**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी उन्हाळ्यात पर्यटकांची गर्दी असतेच, परंतु मागील काही वर्षांपासून वर्षा ऋतुत सुद्धा सुट्ट्यांच्या हंगामात तसेच शनिवार व रविवार अश्या प्रत्येक विकेंडला मोठ्या प्रमाणात पर्यटकांचा महापूर ओसंडून वाहताना दिसत असतो. या वेळी येथे येणाऱ्या पर्यटकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. यासाठी जागतिक दर्जाच्या माथेरान पर्यटन स्थळाला सक्षम नेतृत्वाची आणि शासन प्रशासनाच्या सकारात्मक दृष्टिकोनाची आवश्यकता असल्याची या ठिकाणी बोलले जात आहे.

जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेले माथेरान पर्यटनस्थळ मुंबई-पुण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर असल्याने येथे पर्यटकांची रेलचेल बाराही महिने सुरू असते. आता सुरू होणाऱ्या पावसाळी पर्यटनासाठी पर्यटक मोठ्या संख्येने माथेरानला येत असतात. येथे पावसाळ्यात गर्द झाडीमधून पावसाच्या शीतल धारा अंगावर झेलत प्रवास करण्याची मजा काही औरच असते. दाट धुक्याच्या सानिध्यात निसर्गाशी हितगुज करण्यात आणि येथील शांत वातावरणात रमून जाणे म्हणजे एक वेगळीच अनुभूती मिळते. यासाठी वर्षा ऋतूमध्ये विशेषतः शनिवार आणि रविवार पर्यटकांची याठिकाणी यात्रा भरलेली दिसते.

नेहमी येत असलेल्या पर्यटकांना येथील भौगोलिक परिस्थिती ठाऊक असते त्याच डोंगरदऱ्या, ओबडधोबड रस्ते कोणत्याही प्रकारे पर्यटकांना सुसज्ज सोयीसुविधा उपलब्ध नाहीत याची पूर्णपणे कल्पना असताना देखील केवळ हे अगदी जवळचे आणि स्वस्त दरात उपलब्ध होणारे पर्यटन स्थळ असल्यामुळेच येथे पर्यटक येत असतात. यांच्यामुळेच येथे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असतात.

अतिथी देवो भव: ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणली जात नाही. याठिकाणी केवळ वाहतुकीच्या गहन समस्येमुळे पर्यटनाची गती खुंटण्याच्या मार्गावर स्पष्टपणे दिसून येत आहे. राजकीय नेते मंडळी तालुक्यातील, जिल्ह्यातील, राज्यातील पर्यटन वाढविण्यासाठी सजग दिसत असून माथेरान हेसुध्दा रायगड जिल्ह्यातील एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून जगप्रसिद्ध असताना इथल्या पर्यटन वाढीसाठी प्रयत्न केले जात नाहीत. निवडणूक काळात सर्वच नेत्यांना मतांसाठी माथेरान आठवते, पण निवडणुका पार पडल्यानंतर प्रत्यक्षात कुणीही इथल्या स्थानिकांच्या अडीअडचणी, मूलभूत सुविधांचा अभाव ज्ञात असतानादेखील हेतुपुरस्सर कानाडोळा करत आहेत.

आजही इथला सर्वसामान्य माणूस मुलाबाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पर्यायी मार्ग असावा, असे स्वप्न उराशी बाळगून आहे. माथेरानमध्ये कोणत्याही प्रकारची सुविधा आणि स्थानिकांच्या समस्या मार्गी लागणे गरजेचे आहे, असे ज्येष्ठ मंडळी बोलत आहेत.

# पाली येथे खड्ड्यांचे साम्राज्य

## वाहनचालक आणि नागरिक त्रस्त



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

वाकण-पाली-खोपोली महामार्गावरील पाली येथे खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून, वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. महामार्गावरील दयनीय स्थितीमुळे प्रवास करताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. विशेषतः बिकानेर मिठाईच्या दुकानासमोरील खड्डे आणि विक्रम स्टँडच्या समोरील खड्डे हे मोठ्या प्रमाणावर वाढले असून, यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

पाली शहरातील हा महामार्ग वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, दररोज हजारो वाहने या मार्गावरून प्रवास करतात. मात्र, बिकानेर मिठाईच्या दुकानासमोरील मोठा खड्डा आणि विक्रम स्टँडच्या समोरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांना वेग कमी करून सावधगिरीने मार्गक्रमण करावे लागत आहे. अनेकदा अचानक ब्रेक लावल्याने मागील वाहनांची धडक लागण्याचा धोका निर्माण होतो.

सध्या पावसाळा तोंडावर आला असताना, महामार्गावरील खड्डे बुजवणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाच्या पाण्यामुळे हे खड्डे अधिक खोल होऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे. मात्र, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या समस्येकडे लक्ष करत द्यावे, अशी मागणी होत आहे. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

### उपाययोजनेची मागणी

पावसामुळे रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे झाले आहेत. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी एमएसआरडीसीने त्वरित दखल घेऊन महामार्गावरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी केली आहे. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यास वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होईल व अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तक्रारींची वाट न पाहता तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# श्रीवर्धनमध्ये वटवृक्षाचे पूजन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



हिंदू धर्मात वटपौर्णिमा हा दिवस विवाहित स्त्रियांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य, सौख्य, समृद्धी व अखंड सौभाग्यासाठी पत्नी मोठ्या श्रद्धा आणि भक्तीभावाने उपवास करून वटवृक्षाची पूजा करतात.

याच श्रद्धेचा भव्य आविष्कार यंदा श्रीवर्धन येथील श्री लक्ष्मी नारायण मंदिर परिसरात पाहायला मिळाला. वटपौर्णिमेनिमित्त मंदिरातील वटवृक्षाभोवती पारंपरिक साड्या, गजरे, कुंकू, हळदीचे शिंपण आणि मंगलाष्टकांचा गजर याने वातावरण भारावून गेले होते.

सात जन्मी हाच नवरा मिळावा या प्राचीन संकल्पनेला साजेशी भक्तिभावाने ओतप्रोत पूजन विधी पार पडताना दिसले. स्त्रियांनी विधीवत उपवास करून प्रथम श्री लक्ष्मी नारायणांचे दर्शन घेतले, त्यानंतर वडाच्या झाडाभोवती तीन वेळा प्रदक्षिणा घालून, धागा गुंडाळत वटसावित्रीचे पूजन केले.

अनेक स्त्रियांनी सांगितले की, सावित्रीने आपल्या प्रबळ संकल्प आणि भक्तीने यमराजालाही नमवले, आणि सत्यवानाचा जीव परत मिळवला. आम्हीही तिच्या मार्गानेच चालतो. आमच्या नवऱ्याच्या आयुष्याला देवाची साथ लाभो, हीच आमची प्रार्थना. श्रीवर्धनमधील महिला वर्ग या सणासाठी विशेष तयारी करतात. अनेक महिलांनी वडपूजनासाठी विशेष रांगोळ्या, पुजेचे थाळे, फुलांच्या माळा, आरास यांची पूर्वतयारी केली होती. श्रीवर्धन शहरातील महिलांनी लक्ष्मी नारायण मंदिरात मोठ्या संख्येने एकत्र येऊन पूजन सोहळा झाला.

धार्मिक ग्रंथांनुसार, महाभारतातील व स्कंदपुराणात वटपौर्णिमेचे महत्त्व विशेषतः वर्णन करण्यात आले आहे. सावित्रीच्या अद्वितीय भक्तीमुळे वटवृक्ष हा पतिव्रतेच्या श्रद्धेचा प्रतीक म्हणून मानला जातो. या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा आदर राखत, श्रीवर्धनमधील स्त्रियांनी वटपौर्णिमेचा सण साजरा करून श्रद्धा, निष्ठा आणि भारतीय संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवले.

वड पूजताना आम्ही फक्त नवऱ्याचेच नव्हे, संपूर्ण कुटुंबाचे कल्याण मागतो. यामध्ये आमचं मन, भक्ती, आणि आस्था यांचं संपूर्ण अर्पण असते, असे महिलांनी सांगितले.

# बहुजन विद्यार्थी संघटनेचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**




बहुजन विद्यार्थी संघटना विद्यार्थ्यांच्या न्याय हक्क व हितासाठी लढणारी संघटना म्हणून कार्यरत आहे. राज्याध्यक्ष अनिल वाणी यांच्या नेतृत्वात या संघटनेच्या कार्यकक्षा व्यापक झाल्या आहेत. याच बहुजन विद्यार्थी संघटनेचा कार्यकर्ता मेळावा नुकताच पाली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल वाणी व अन्य प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. या मेळाव्यावेळी अनिल वाणी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समस्त देशाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यामुळे हे शिक्षण सर्वांना मिळावे, शिक्षणाच्या माध्यमातून तमाम बहुजनांचे हक्क अधिकार कायम अबाधित राहावेत यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तळागाळात जाऊन प्रभावी काम करावे, असे आवाहन वाणी यांनी केले. तसेच याच बैठकीमध्ये त्यांनी रायगड जिल्ह्याचे माजी अध्यक्ष संतोष गायकवाड यांची कोकण प्रदेश अध्यक्ष पदी निवड केली, तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी अमित गायकवाड यांची निवड करण्यात आली.

या बैठकीला रायगड जिल्हा सचिव प्रकाश कांबळे, पेण तालुका अध्यक्ष नागेश सुर्वे, पनवेलतालुका अध्यक्ष प्रशिक बिनेदार, सुधागड तालुका अध्यक्ष सुशील गायकवाड, बहुजन विद्यार्थी संघटनेचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष निशांत पवार, विवेक रोकडे, सिद्धांत गायकवाड, अक्षय गायकवाड यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. अमित गायकवाड यांच्या निवडीने रायगड जिल्ह्यामध्ये नवचैतन्य निर्माण होऊन बहुजन विद्यार्थी संघटना आणखी जोमाने काम करेल, अशी आशा अनिल वाणी यांनी या ठिकाणी व्यक्त केली.



**अलिबाग : वडाच्या झाडाला धागा बांधत आणि हिरव्या बांगड्या, हळकुंड, सुपारी, बदाम यासह आंबा फळ वाहून महिलांनी मंगळवारी अलिबागमध्ये वटपौर्णिमेनिमित्त पूजा केली.**

# वृक्षारोपण वाया जाऊ देऊ नका!

नुकतेच ५ जुन जागतिक पर्यावरण दिन साजरा करताना अनेकांनी मोठ्या आवडीने वृक्षारोपण करून आपआपल्या सोशल माध्यमांवर स्टेटस लावले. पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होतानाचे विदारक चित्र बदलेल पाहीजे असे सर्वांनाच वाटते, पण प्रत्यक्षात मात्र आपल्या छोट्या बाबींवर दुर्लक्ष केल्यामुळेच खरतर आपणच पर्यावरणाच्या हानीकारक कृतीस खरे जबाबदार आहोत.

गेल्याच वर्षी वृक्षरोपणासाठी आणलेल्या पिशवीतील रोपांना पिशवीतच चक्क फळ आली, त्या पिशव्या अजुनही रोपणाच्या प्रतिक्षेत एका मराठी शाळेजवळ पडून असल्याची माहीती समोर येत आहे. माणगांवच्या कचरा डेपो जवळ गेल्या वर्षी केलेले वृक्षारोपण वाया गेले असे म्हणने वावगे ठरू नये कारण आजमितीस एकही रोप तिथे जगलेल दिसत नाही हे वास्तव समोर येत मागील वर्षीच्या वृक्षारोपणाचे काय झाले? सवाल ऐरणीवर आला आहे.

पर्यावरण दिन साजरा करतो खरच का त्या प्रमाणे वागतो? मी कचरा टाकणार नाही, इतरांनाही टाकुन देणार नाही, हे माझे कर्तव्यच! निसर्गाच संतुलन बिघडलयं; रात्रंदिवस २४ तास आपणच बिघडवतोय! सकाळी उठल्या पासुन ते रात्री झोपे पर्यंत प्लास्टिकचा वापर, आंघोळीला रासायनिक वेष्टनातील साबण, टूथपेस्ट ट्युब, न्याहरीला प्लास्टीक पाऊच- रॅपर मधिल बिस्कीटंचा खाऊ, चहाचे आयते कप, वाढदिवस शुभेच्छापर प्लास्टिक वेष्टीत पुष्प-गुच्छ रॅपर तसेच बाजारातुन भाजी, मांसाहार मच्छी-मटण ते किराणा आणायला प्लास्टिक पिशव्यांचाच वापर होत आहे.


आता तर धान्याच्या तागी सुती पोत्यांऐवजी चक्क प्लास्टीकच्या गोणी, एक ना अनेक प्रकारे मानव निर्मित कृत्रीम, पर्यावरणाला घातक, वसुंधरेच्या छाताडावर हजारो वर्ष विघटन न होणारे, जमिन नापिक करणाऱ्या घातक प्लास्टिकचा भार बेदरकारपणे टाकुन निसर्ग, पर्यावरणाचा ऱ्हास बिनधास्त सुरु आहे. नुसतेच दिन साजरीकरन निमीत्ताने मोहीमा, जागरुकता आता पुरेशी ठरणार नाही. दिवस रात्र २४/०७ जागरुकता करावी लागेल, तरच भविष्यातील पिढीला सुसह्य शांत, सुंदर निसर्ग, पर्यावरण आपण या जीवनात सोडून जाल; अन्यथा परिणाम आपण सारे भोगतोच आहोत.

अशी अगणित उदाहरण देता येतील. या बाबत आपण स्वतः यत्कींचितही जागरुक नाही, हे वास्तव आता कोणीही नाकारु शकत नाही. परिणामी पर्यावरणाची ती अपरिमीत हानी वेगाने होत आहे. हेही कमी म्हणुन कि काय, यात भर चक्क विकासाच्या नावे स्वतःच्या फक्त स्वार्थापायी अवैधपणे आपण डोंगर पोखरुन, माती-खनिज, दगड-धोंडे उत्खनन करुन जमिन गर्भातुन बेसुमार पाणी उपसुन, प्रदूषण करून परिणामी पर्यावर्णीय अनाकलनिय क्षणात बदल, चक्रीवादळं, भुकंप, सुनामी महापूर मालिकाच अनुभवास येत आहे.

अनियंत्रीत, बेलगाम प्लास्टिक वापर, नियोजन शुन्य कचरा निर्मितीस सर्वस्वी आपणच जबाबदार आहोत. एखादे झाड लावता येत नसले तरी चालेल, पण कमित कमी निसर्गतः आहेत ती तोडु तरी नका! प्लास्टीक फेकु नका, निसर्ग वाचवा! माझा गांव, शहर, जिल्हा, राज्य, देश स्वच्छ प्रदूषण मुक्त सुंदर राखण ही माझी, आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. कुणी कचरा करत असेल तर कानाडोळा करत, नुसतिच ढीम्म् बघ्याची भुमिका न घेता, मी स्वतः कचरा टाकणार नाही आणि इतरांनाही तो करु देणार नाही. निसर्गाच संतुलन राखणे ही माझी स्वतःची जबाबदारी नव्हे कर्तव्य अशी ईश्वराला स्मरुण शपथ घेऊयात.

**-संतोष सुतार,** माणगाव





### रस्त्यावर खड्ड्यात लावले वडाचे झाड

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग बायपास येथे पेण अलिबाग रस्त्याला पडलेले खड्डे बुजविण्यासाठी साकडे नागरिकांनी घातले आहे. यासाठी वटपौर्णिमेचे औचित्य साधून अनोखी मागणी त्यांनी केली आहे. रस्त्यात पडलेल्या खड्ड्यात वडाचे झाड लावून विधिवत पूजा करून वडाला फेऱ्या मारल्या.

या रस्त्यावर सुमारे तीन फुटांचे खड्डे पडले आहेत. पाऊस असल्यावर या खड्ड्यांमध्ये पाणी साचून तळे तयार होते. याचा नाहकचा फटका वाहनचालकांना बसत आहे. या ठिकाणी कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता आहे. दरम्यान, तरुणांनी केलेल्या या अनोख्या मागणीला वाहनचालकांनी आणि नागरिकांनी साथ दिली.

# गर्भवती आदिवासीसाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालय ठरले वरदान!



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगाव तालुक्यात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आहे. हे उपजिल्हा रुग्णालय कोरोना काळात संपूर्ण रायगड जिल्ह्याला वरदान ठरले होते. अशाच एका माणगाव तालुक्यातील कविलवहाळ येथील गरोदर आदिवासी महिलेला डॉ. गौतम राऊत, डॉ. श्रुती निकम, डॉ. सावंत व उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर देवदूत ठरले आहेत. या डॉक्टरांचा वैद्यकीय अधिक्षक डॉ. अरुणा पोहरे यांनी उपजिल्हा रुग्णालयात सत्कार केला. व रुग्ण महिलेला साडी व बाळासाठी कपडे देऊन त्यांचा देखील सन्मान करण्यात आला.

तालुक्यातील कविलवहाळ आदिवासीवाडी येथील शालीनी अरुण रमेश वालेकर ही १ जून रोजी पहाटे ७.९० उपजिल्हा रुग्णालयात ऍडमिट झाली होती. पेशंटला नॉर्मल डिलीव्हरीसाठी प्रयत्न केले, परंतू, ती सी.पी.डी. असल्याने सिजेरियन करणे गरजेचे होते. ड्यूटीवरील डॉ. रामदास तरपेवाड (स्त्रीरोगतज्ञ) यांनी डॉ. सावंत (भूलतज्ञ) यांना बोलावून सकाळी ९ वा. सिझेरियन करण्यात आले. दुपारी १२च्या सुमारास पेशंटला रक्तस्त्राव सुरु झाला. तो औषधोपचाराने आटोक्यात आला. दुपारी पुन्हा पेशंटला रक्तस्त्राव सुरू आला. तोसुद्धा औषधोपचाराने आटोक्यात आणण्यात आला. पुन्हा रक्तस्त्राव सुरु झाला. तो औषधोपचाराने आटोक्यात येत नव्हता. त्यात पेशंटला आकडी येऊ लागली. रक्तस्त्राव कमी करण्यासाठी गर्भपिशवी काढणे गरजेचे होते, परंतु सिनियर स्त्रीरोगतज्ञ आणि सर्जन उपलब्ध नसल्याने रक्तस्त्राव औषधोपचाराने आटोक्यात आणण्याचे प्रयत्न चालू होते. त्या दरम्यान पेशंटला पाच रक्तपिशव्या लावण्यात आल्या. सर्जनची गरज असल्याने डॉ. गौतम राऊत यांना संपर्क करण्यात आला, परंतु ते कामानिमित बाहेर होते. त्यांनी येऊन ऑपरेशन करण्याची तयारी दर्शवली व भूलतज्ञ डॉ. सावंत यांनी रुग्णाची नाडी व बी. पी लागत नसतानाही भूल देण्याची तयारी दर्शवली. पेशंटला ऑपरेशनला घेईपर्यंत डॉ. श्रुती निकम, डॉ. रामदास तरपेवाड, डॉ. अरुणा पोहरे यांनी पेशंटला वाचविण्यासाठी जिद्दनि प्रयत्न केले. सायंकाळी ७.३० वा. डॉ. राऊत यांनी ऑपरेशन यशस्वीरित्या पार पडले. व रुग्ण शुद्धीवर आली. नाडी व बी. पी लागू लागले.

यासाठी प्रसुती विभागातील इन्चार्ज शिवक्रांती गवळी, ऑपरेशन थिएटरच्या इन्चार्ज सिस्टर मोकाशी, स्टाफ अनिता करकरे, दिपाली नेमाणे, वनिता तेटगुरे, लता, प्रणिता, राजेंद्र ब्रदर, संजय देसाई, अशोक महाडिक, जगदिश, नितिन गायकवाड यांच्या सहकार्याने पेशंटला वाचविण्यात यश आले.

# क्रिकेटविश्वाला आणखी एक धक्का!

## वेस्ट इंडिजचा निकोलस पूरन निवृत्त



**किंग्जस्टन : वृत्तसंस्था**

मागील काही दिवसांपासून जगभरातील विविध देशांमधील दिग्गज क्रिकेटपटूंनी निवृत्ती जाहीर केली आहे. यानंतर मंगळवारी (दि. १०) क्रिकेटविश्वाला आणखी एक धक्का बसला. वेस्ट इंडिजचा स्टार क्रिकेटपटू निकोलस पूरनने वयाच्या २९व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

निकोलस पूरनने इन्स्टाग्राम पोस्टमध्ये नमूद केले की, खूप विचार आणि चिंतन केल्यानंतर मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. या खेळाने मला खूप आनंद दिला. हा खेळ अविस्मरणीय आठवणींबरोबरच वेस्ट इंडिजच्या लोकांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देत राहील. मरून रंगाची जर्सी घालणे, राष्ट्रगीतासाठी उभे राहणे आणि प्रत्येक वेळी मैदानावर पाऊल ठेवताना सर्वकाही देणे त्या क्षणांचे शब्दात वर्णन करणे कठीण आहे. याचा माझ्यासाठी काय अर्थ आहे हे स्पष्ट करणे कठीण आहे. कर्णधार म्हणून संघाचे नेतृत्व करणे हा एक सन्मान आहे, जो मी नेहमीच माझ्या हृदयात ठेवेन. तुमच्या अढळ प्रेमाबद्दल चाहत्यांचे आभार.

माझ्या कारकिर्दीचा हा आंतरराष्ट्रीय अध्याय संपला असला तरी वेस्ट इंडिज क्रिकेटवरील माझे प्रेम कधीही कमी होणार नाही. मी संघ आणि प्रदेशाला पुढील वाटचालीसाठी यश आणि बळ मिळो अशी शुभेच्छा देतो, असेही पूरनने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

> **तुम्ही कठीण काळात मला साथ दिली. चांगले क्षण मोठ्या उत्साह साजरा केला. या संपूर्ण प्रवासात मला साथ देणारे माझे कुटुंब, मित्र आणि सहकाऱ्यांचे आभार. तुमचे आशीर्वाद आणि पाठिंब्यामुळेच मी या प्रवासात आगेकूच करू शकलो.**
>
> **–निकोलस पूरन**

पूरनने निवृत्तीचे कारण स्पष्ट केले नसले तरी जगभरातील टी-२० लीग खेळण्यासाठी त्याने हा निर्णय घेतला असावा, असे मानले जात आहे. वेस्ट इंडिजचे ड्वेन ब्राव्हो, ख्रिस गेल, आंद्रे रसेल आणि सुनील नारायण यांनीही जगभरातील टी-२० लीग खेळण्यासाठी निवृत्ती जाहीर केली होती. आता पूरन जगभरातील विविध लीग खेळत राहिल. सध्या टी-२०मधील स्टार फलंदाजांपैकी एक अशी त्याची ओळख आहे. फ्रँचायझी त्याला त्यांच्या संघात समाविष्ट करण्यास उत्सुक आहेत.

**अशी आहे आंतरराष्ट्रीय कारकीर्द**

पूरनने वेस्ट इंडिजसाठी ६१ वन-डे सामने आणि १०६ टी-२० सामने खेळले. वन-डेमध्ये त्याने ३९.६६च्या सरासरीने १९८३ धावा केला, तर टी-२०मध्ये २६.१५च्या सरासरीने आणि १३६.४०च्या स्ट्राईक रेटने २२७५ धावा केल्या आहेत. पूरनने वन-डेमध्ये सामन्यात तीन शतके आणि ११ अर्धशतके झळकावली आहेत, तर टी-२०मध्ये १३ अर्धशतके त्याच्या नावावर आहेत. पुरनने वेस्ट इंडिजसाठी कधीही कसोटी सामना खेळला नाही. त्याने एकदिवसीय सामन्यातही सहा विकेट्स घेतल्या आहेत. तो सर्वात लहान स्वरूपात वेस्ट इंडिजचा कर्णधारदेखील राहिला आहे.



## महिला आइस हॉकी आशिया कप स्पर्धेत भारतीय संघाला कांस्यपदक

**अल ऐन : वृत्तसंस्था**

भारतीय महिला आइस हॉकी संघाने युएई येथे झालेल्या आयआयएचएफ आशिया कपमध्ये ऐतिहासिक कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेत पाच देशांनी सहभाग घेतला होता. भारताने पाच सामन्यांत सात गुणांसह स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले. महिला आइस हॉकी आशियाई कपमध्ये भारताचे हे पहिलेच पदक आहे.

या स्पर्धेत भारताने एकूण पाच सामने खेळले. यापैकी तीन सामने जिंकले, तर दोन सामन्यात पराभव स्वीकारावा लागला. स्पर्धेत इराण, फिलीपिन्स, भारत, मलेशिया, यूएई आणि किर्गिस्तानसह सहा देश सहभागी झाले. भारताने मलेशिया, यूएई आणि किर्गिस्तान या तीन संघांना पराभूत करून कांस्यपदक जिंकले.

सुरुवातीला स्पर्धेला महिला आशियाई चॅलेंज कप असे नाव देण्यात आले. त्यानंतर २०२३मध्ये या स्पर्धेचे नाव बदलून आशिया-ओशनिया चॅम्पियनशिप ठेवण्यात आले. भारताच्या विजयामुळे देशभरात आनंदाचे वातावरण आहे.

## अडथळा शर्यतीत तेजस शिरसेला सुवर्णपदक

**तैपई सिटी : वृत्तसंस्था**

तैवान ओपन इंटरनॅशनल ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. या भारतीय खेळाडूंनी एकाच दिवसात सहा सुवर्णपदकांना गवसणी घातली. यामध्ये मराठमोळा खेळाडू तेजस शिरसेने सुवर्णपदक जिंकत महाराष्ट्राच्या आणि भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तेजसच्या शर्यतीचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



तेजस शिरसे हा गेल्या काही वर्षांपासून अडथळा शर्यतीत भारताचे प्रतिनिधीत्व करत आहे. २३ वर्षीय तेजसने ११० मीटर अडथळा शर्यतीत १३.५२ सेकंद वेळ नोंदवत सुवर्णपदक पटाकवले. तेजसच्या कारकिर्दीतील ही त्याची दुसरी सर्वात वेगवान वेळ आहे. यापूर्वी त्याने १३.४१ सेकंद अशी सर्वात वेगवान प्रभावी वेळ नोंदवली होती.

तेजसने सुवर्णपदक पटकावल्यानंतर त्याच्या इन्स्टाग्रामवर त्याच्या शर्यतीचा एक व्हीडिओ शेअर केला आहे. त्याच्या शर्यतीच्या व्हीडिओला त्याने 'राजं आलं राजं आलं जिंकूनी' हे पावनखिंड चित्रपटातील गाणे लावले आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये त्याने लिहिलेय की, जय भवानी जय शिवाजी. महाराष्ट्राचा सुपुत्र, भारताची शान! त्याचा हा व्हिडीआदेखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## पंचावर रागावल्याबद्दल रविचंद्रन अश्विनला दंड

**चेन्नई : वृत्तसंस्था**

तामिळनाडू प्रीमियर लीग २०२५मध्ये खेळल्या गेलेल्या आयड्रीम तिरुप्पुर तमिझान्सविरुद्धच्या सामन्यात डिंडीगुल ड्रॅगन्स संघाचा कर्णधार रविचंद्रन अश्विन महिला पंचावर भडकल्याचे पहायला मिळाले होते. अंपायरवर चिडणे त्याला भलतेच महागात पडले.

डिंडीगुल ड्रॅगन्सच्या डावातील पाचव्या षटकात साई किशोरच्या गोलंदाजीवर अश्विनने स्वीप मारण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या पॅडला लागला. साई किशोर अपील केले आणि अंपायरने आऊट दिले. चेंडू लेग-स्टंपच्या बाहेर टप्पा पडत असतानाही अंपायरने आऊट दिल्याने अश्विन नाराज झाला. त्याने अंपायरला पटवून देण्याचा प्रयत्न केला की, हा चेंडू लेग स्टंपच्या बाहेर पडला आहे, मात्र पंचांनी लक्ष दिले नाही आणि त्या पुढे चालत निघून गेल्या. यामुळे अश्विन भडकला आणि स्वत:च्या पॅटवर बॅट मारली होती. अश्विनने अशा पद्धतीची वर्तणूक केल्यानंतर त्याला मानधनाच्या एकूण ३० टक्के रक्कम दंड म्हणून ठोठवण्यात आली आहे.

## रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत सुरेश बिस्ट प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

सुधाकरभाऊ घारे फाऊंडेशन पुरस्कृत रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत कामोठे (पनवेल) येथील सुरेश बिस्ट यांनी प्रथम क्रमांक पटकावला.



कर्जत येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयातील सभागृहात सुधाकरभाऊ घारे फाऊंडेशन पुरस्कृत रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा रंगली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १५२ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये कर्जत, खालापूर तालुक्यातील ६०च्या वर खेळाडू सहभागी झाले होते. एकूण १५१ सामने झाले.

यामध्ये प्रथम क्रमांक कामोठे येथील सुरेश बिस्ट यांनी मिळवला. द्वितीय क्रमांक कामोठे येथीलच वैभव शिंदे, तर तृतीय क्रमांक अलिबागच्या अभिजित तुळपुळे यांनी मिळविला. ब्रेक टू फिनिश खेळी नीलकंठ उकली, राजेश गोईल, सुरेश बिस्ट यांनी करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मुख्य पंच म्हणून आशिष बागकर, तर सहाय्यक पंच म्हणून देविदास सिनलकर यांनी कामगिरी बजावली.

पारितोषिक वितरण समारंभात जिल्हा समितीचे खजिनदार वैभव पेठे यांनी, अशा प्रकारची स्पर्धा पहिल्यांदाच वातानुकुलित सभागृहात होत आहे. स्पर्धेचे आयोजन एक नंबरचे होते. कुठेही कोणतीच त्रुटी नव्हती. कॅरम खेळाकडे युवा खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

संपूर्ण स्पर्धा अध्यक्ष गिरीश तुळपुळे, सचिव दीपक साळवी, कार्यकारिणी सदस्य पांडुरंग पाटील आदींच्या उपस्थितीत झाली. त्यांना स्पर्धा प्रमुख मिलिंद लाड, प्रकाश पालकर, केतन बेलोसे, प्रमोद लाड, मिलिंद चिखलकर, कुमेश मोरे, सोमनाथ पालकर आदींनी सहकार्य केले. रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, भरत भगत यांनी स्पर्धेच्या ठिकाणी येऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

विजेत्या स्पर्धकांना माजी सरपंच मधुकर घारे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. बक्षीस वितरण समारंभास सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, प्रकाश पालकर, शरद हजारे, अनंत निलधे, दीपक लाड, आर.के. कोळंबे, अशोक दिघे, अतुल कडू, महेश निगुडसे, अमीर माणियार, प्रशांत चंदन, सुजित भोईर, सुहास वांजळे, विलासबुवा लाड, अमोल लाड, दिगंबर कांबळे, सुजित लाड आदी उपस्थित होते.

## ऋषभ पंतचा 'छप्परतोड' षटकार!

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यासाठी शुबमन गिलला संघाचे कर्णधारपद दिले आहे, तर ऋषभ पंत हा उपकर्णधार असणार आहे. इंग्लंडमधील सरावाचे अनेक फोटो, व्हिडीओ शेअर केले जात आहे. दरम्यान, पंतचा एक व्हीडिओ व्हायरल होतोय, ज्यामध्ये फलंदाजी करताना त्याने लगावलेल्या षटकाराने लॉर्डस्च्या स्टेडियममधील एका भागाचे छप्पर तुटले आहे.

> **लॉर्ड्सवर चेंडू स्टेडियमच्या छतावर जाऊन आदळला**

भारताच्या सराव सत्रादरम्यान पंतने स्फोटक फलंदाजी करत फिरकीविरूद्ध काही मोठे फटके खेळले. पंतला फिरकीपटू वॉशिंग्टन सुंदर गोलंदाजी करत होता. पंतने त्याच्या गोलंदाजीवर एक दणदणीत षटकार खेचला, जो स्टेडियमच्या छतावर पडला आणि छताच्या काही भागाचे नुकसान झाले.

## ...ही भावना मी कायम जपून ठेवेन!

### 'आयसीसी हॉल ऑफ फेम' धोनीची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी याचा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला आहे. लंडनमधील प्रतिष्ठित ॲबे रोड स्टुडिओमध्ये आयोजित एका शानदार समारंभात आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट झालेल्या सात प्रतिष्ठित खेळाडूंमध्ये माजी भारतीय कर्णधाराचा समावेश होता. या सन्मानानंतर धोनीने आपली पहिली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट झाल्यानंतर बोलताना महेंद्रसिंह धोनी म्हणाला की, आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश होणे हा एक सन्मान आहे. पिढ्यान्‌पिढ्या आणि जगभरातील क्रिकेटपटूंच्या योगदानाची दखल घेणारा हा सन्मान आहे. अशा सर्वकालीन महान खेळाडूंसोबत तुमचे नाव लक्षात ठेवणे ही एक अद्भूत भावना आहे. ही भावना मी कायम जपून ठेवेन.

दरम्यान, धोनी हा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट होणारा देशातील अकरावा क्रिकेटपटू ठरला आहे.
















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com